# झोपडपट्ट्यांचा प्रश्न :
# विकासनीतीमध्ये बदल हवा

प्रयास

संसाधने व उपजीविका गट, पुणे

Y57:7:7.2311.P1
P5
269581

मे २००५

# झोपडपट्ट्यांचा प्रश्न :
# विकासनीतीमध्ये बदल हवा

## अनुक्रमणिका


प्रस्तावना

१. मुंबईतील झोपडपट्टीच्या प्रश्नाची थोडक्यात पार्श्वभूमी

२. भारतातील रुढ विकासनीती

३. भारतातील रुढ विकासनीतीच्या एकत्रित परिणामांची समीक्षा

४. पर्यायी विकासनीतीचे आर्थिक अंग

५. पर्यायी विकासनीतीचे राजकीय अंग

समारोप



Y57:7:7.2311.P1
P5

269581


### प्रयासविषयी

प्रयास हा वैद्यकीय व तंत्रज्ञानाच्या क्षेत्रातील काही व्यावसायिकांनी एकत्र येऊन स्थापलेला व कायद्यानुसार नोंदलेला सार्वजनिक विश्वस्त निधी आहे. प्रयासच्या वतीने 'आरोग्य', 'ऊर्जा', 'शिक्षण व पालकत्व' तसेच 'संसाधने व उपजीविका' ह्या क्षेत्रांत अनेक उपक्रम चालवले जातात. आपले व्यावसायिक ज्ञान व कौशल्ये वापरुन समाजातील वंचित वर्गांच्या स्वउन्नतीसाठीच्या प्रयत्नांना व संघर्षांना साहाय्यभूत ठरावे ह्या उद्देशाने प्रयासचे सदस्य काम करीत असतात. संशोधन, विश्लेषण, प्रशिक्षण, माहितीचा प्रसार, वाङ्मयनिर्मिती, इ. विविध मार्गांनी वरील उद्देशांच्या पूर्तीसाठी प्रयत्न केले जातात.

# झोपडपट्ट्यांचा प्रश्न : विकासनीतीमध्ये बदल हवा

## प्रस्तावना

मुंबईमध्ये डिसेंबर २००४ मध्ये मुंबई महापालिकेने अनधिकृत झोपड्यांवर धडक कारवाई करून जवळपास ८५,००० झोपड्या उध्वस्त केल्या. यामध्ये चार लाखाहून अधिक लोक विस्थापित झाले. मुंबई शहराला आंतरराष्ट्रीय दर्जाचे शहर बनवण्याचा सरकारचा निर्धार असल्यामुळे वाढती अतिक्रमणे व अनधिकृत झोपड्यांना कठोर आळा घालण्यात येईल असे मुख्यमंत्र्यांनी जाहीर केले. देशाच्या आर्थिक राजधानीबरोबरच जागतिक स्तरावरचे महत्त्वाचे वित्तीय केंद्र म्हणून वेगाने विकसित पावणाऱ्या मुंबईला सुंदर आणि स्वच्छ बनविण्याची निकड सरकारला सध्या भासत आहे. विश्व बँक, आशियाई विकास बँक आणि देशी-विदेशी कंपन्यांची भांडवल गुंतवणूक शहरात खेचून आणताना मुंबई परदेशी पाहुण्यांना स्वच्छ, सुंदर दिसावी, नजरेला बोचणारे दारिद्र्य, बकाली, वंचितता याचे दर्शन काही मैलांच्या परिसरात तरी कोठेही घडू नये याबद्दल सरकार काळजी घेताना दिसते. या प्रयत्नांचा एक भाग म्हणून मुंबईत ठिकठिकाणी मोठे रस्ते, पूल, भुयारी मार्ग, उड्डाणपूल यांचे जाळे विकसित करण्यात आले आहे. मुंबई क्षेत्रविकास प्राधिकरण, रस्ते विकास महामंडळ, आणि मुंबई महानगर नागरी प्रकल्प या संस्थांच्या माध्यमातून मुंबईच्या विकासाचा ३२ हजार कोटी रुपयांचा आराखडा तयार करण्यात आला आहे. मुंबईच्या सौंदर्यीकरणाच्या या मोहिमेत बकाल झोपडपट्ट्यांचा

अडसर दूर करण्यासाठी सरकारने विमानतळ, रेल्वे तसेच प्रमुख मार्गांवरील सुमारे दोन लाख झोपड्यांचे पुनर्वसन करण्याचे ठरवले. (मुंबईच्या एकूण लोकसंख्येपैकी ५०% लोक झोपडपट्ट्यात राहतात, हे येथे लक्षात घ्यायला हवे.) या सर्व प्रयत्नांतून मुंबईला स्वच्छ, चकचकीत, अत्याधुनिक महानगर म्हणून 'प्रोजेक्ट' करण्याची सरकारची धडपड दिसून येते.

झोपडपट्टीचा प्रश्न मुंबईतील धडक कारवाईमुळे ऐरणीवर आलेला असला तरी हा प्रश्न केवळ मुंबईपुरताच मर्यादित नाही. भारतातील सर्व प्रमुख महानगरात वाढत्या झोपडपट्ट्या हे वास्तव आहे. भारतात नागरी लोकसंख्येचे प्रमाण सातत्याने वाढत आहे आणि त्याचबरोबर झोपड्यांमध्ये राहणाऱ्या लोकसंख्येतही सतत वाढ होते आहे. महाराष्ट्राचा विचार केला तर, महाराष्ट्रातील ४२.४% लोकसंख्या शहरांमध्ये राहते, तर राज्यातील एकूण शहरी लोकसंख्येच्या २६% लोक झोपडपट्ट्यात राहतात. झोपडपट्ट्यांची वाढ ही महानगरात आणि नगरात एक प्रमुख समस्या बनली असून झोपड्यातील लोकांनी शहराबाहेर स्थलांतर करावे असा वाढता दबाव त्यांच्यावर सर्वत्र दिसतो. परंतु त्याचवेळी झोपडपट्टीतील लोक ज्या सेवा इतरांना पुरवतात, त्यांची गरज सातत्याने वाढताना दिसते. विविध महानगरातील 'झोपडी हटाओ' मोहिमेमुळे भारतात झोपडपट्टीच्या प्रश्नाने गंभीर स्वरूप धारण केले आहे. या प्रश्नाशी लाखो वंचित लोकांच्या भवितव्याचा प्रश्न निगडीत असल्यामुळे या प्रश्नावर कायमस्वरूपी तोडगा काढणे अत्यावश्यक आहे.

## १. मुंबईतील झोपडपट्टीच्या प्रश्नाची थोडक्यात पार्श्वभूमी

ब्रिटिशांनी त्यांच्या अर्थव्यवस्थेच्या गरजेसाठी मुंबईचा बंदर म्हणून आणि एक औद्योगिक केंद्र म्हणून विकास घडवला. स्वातंत्र्यानंतरच्या काळात मुंबई व तिच्या परिसरात महाराष्ट्रातील कारखानदारी प्रामुख्याने एकवटली गेली. कापडगिरण्या, इंजिनिअरींग इंडस्ट्री, केमिकल्स व फार्मास्युटिकल इंडस्ट्री यांचा विकास मुंबईत झालेला दिसतो. रस्ते, पाणी, वीज, वाहतूक व भांडवलाच्या उपलब्धतेमुळे मुंबईचे औद्योगीकरण झपाट्याने झाले. औद्योगिक विकासामुळे मुंबईमध्ये रोजगाराच्या संधी मोठ्या प्रमाणात निर्माण झाल्या. यामुळे महाराष्ट्रातील इतर भागातून तसेच देशाच्या विविध भागातून रोजगारासाठी मुंबईत स्थलांतर करणाऱ्यांचा ओघ सुरू झाला. महाराष्ट्राच्या ग्रामीण

भागात पडलेला दुष्काळ आणि रोगांच्या साथी यामुळेही मुंबईत स्थलांतराचा वेग वाढला. स्थलांतराची ही प्रक्रिया अजूनही सातत्याने सुरू राहिल्याचे दिसते. मुंबईतील कापडगिरण्या बंद पडल्याने तसेच जागतिकीकरणानंतरच्या काळात औद्योगिक क्षेत्रावर विपरित परिणाम घडल्याने मुंबईतील कामगारवर्गाच्या स्वरूपात निश्चितच फरक पडला. मात्र, रोजगाराच्या शोधात मुंबईत स्थलांतर करण्याच्या प्रक्रियेत फरक पडलेला दिसत नाही. १९९१ ते २००१ या काळात मुंबईची लोकसंख्या २०.७ टक्क्यांनी वाढली तर याच काळात या महानगरातले रोजगार २७.५ टक्क्यांनी वाढले. नवनवीन क्षेत्रात रोजगारनिर्मिती होत असल्याने मुंबईच्या लोकसंख्येत सातत्याने भर पडताना दिसते.

मुंबईच्या लोकसंख्यावाढीचा अटळ परिणाम म्हणून मुंबईत झोपडपट्ट्यांची प्रचंड वाढ झालेली दिसते. मुंबईतील जागांच्या किंमती या काळात भरमसाठ वाढल्या. सातत्याने शहरात दाखल होणाऱ्या मोठ्या लोकसमूहांनी मोकळ्या जागांवर, रेल्वेमार्गालगत, रस्त्यांच्या कडेला, पुलाखालील मोकळया जागांवर, तसेच बऱ्याचदा समुद्रकिनाऱ्यानजीकच्या दलदलीच्या जमिनीवर भराव टाकून तेथे आपले बस्तान बसवले. २००१च्या जनगणनेनुसार बृहन्मुंबईत १.१९ कोटी लोकसंख्येपैकी ४९ टक्के लोक झोपडपट्ट्यात राहतात. झोपडपट्टीच्या वाढीबरोबरच तेथे स्थानिक गुंड, दादा लोक यांचा उदय झाला. या स्थानिक दादांच्या साहाय्याने झोपडपट्टीचा वापर मतपेढी म्हणून करण्यास विविध राजकीय पक्षांनी सुरुवात केली. यामुळे झोपडपट्टीच्या वाढीमुळे होणाऱ्या दुष्परिणामांवर सातत्याने लिहिले बोलले गेले तरी राजकीय कारणांसाठी झोपड्यांना वेळोवेळी संरक्षण मिळत गेले. या तथाकथित अनधिकृत झोपड्यांवर कारवाई करण्याच्या घोषणा एकीकडे दिल्या जात असतानाच दुसरीकडे दर पाच वर्षांनी झोपड्या अधिकृत करण्याचे धोरण अवलंबिले गेले. यानुसार आधी १९८५ मग १९९० व १९९५ पर्यंतच्या झोपड्यांना अधिकृत म्हणून संरक्षण मिळाले. १९९५ ते २००० या शिवसेना-भाजप युती सरकारच्या काळात झोपडपट्टीवासियांसाठी स्वस्त घरे बांधून देण्याची महत्त्वांकाक्षी योजना आखण्यात आली. परंतु अल्पावधीतच ही योजना बारगळली आणि यातून प्रामुख्याने बिल्डर लॉबीचा फायदा झाल्याचे लक्षात आले. २००३ साली झालेल्या विधानसभा निवडणुकीच्यावेळी काँग्रेस-राष्ट्रवादीच्या संयुक्त जाहीरनाम्यामध्ये २००० पर्यंतच्या झोपड्यांना संरक्षण देण्याचे आश्वासन देण्यात आले होते. मात्र सत्तेवर आल्यानंतर या आश्वासनाचा भंग करून मुंबईमध्ये १९९५ नंतरच्या म्हणून

एकूण ८५,००० झोपड्यांवर सरकारने कारवाई केली. यापैकी ७००० झोपड्या १९९५ पूर्वीच्या व म्हणून अधिकृत आहेत. या कारवाईत ३०० एकर जागेवरील झोपड्या सरकारने पाडून टाकल्या. या धडक कारवाईमुळे कित्येकांची उपजीविकेची साधने नष्ट झाली. सरकारने केलेल्या या अन्याय्य कारवाईविरूद्ध आवाज उठवण्यासाठी मुंबईत २७ संघटनांनी मिळून 'झोपडी बचाव संयुक्त कृती समितीची' स्थापना केली. तसेच 'आवास अधिकार कृती समिती' स्थापन करण्यात आली.

या कारवाईमुळे झोपडपट्टीचा प्रश्न परत एकदा चर्चेत आला. या निमित्ताने माध्यमातून विविध मतमतांतरे व्यक्त झाली. त्यामधून या प्रश्नाकडे पाहण्याचे विविध दृष्टिकोन पुढे आलेले दिसतात. सरकार, मध्यमवर्गीय, राजकीय पक्ष, माध्यमे या सर्वांची भूमिका जवळपास सारखी असून मुंबई शहराला वाचवण्यासाठी मुंबईत येणारे लोकांचे लोंढे रोखण्याची तीव्र गरज या सर्वांच्या मांडणीतून पुढे येते. अनधिकृत झोपडपट्ट्या या हिंसा, गुन्हेगारी, गैरव्यवहार, समाजविघातक गोष्टींचे आगर असतात; झोपडपट्ट्यांमुळे मुंबईतील नागरी सुखसोयींवरील ताण वाढतो; झोपड्यांच्या अतिक्रमणामुळे अनेक सार्वजनिक हिताचे प्रकल्प अडले आहेत त्यामुळे प्रकल्पांची किंमत वाढत जाते; पाईपलाईन्स्, विजेच्या तारा यांच्या अवतीभोवतीसुद्धा झोपड्या असल्याने त्यातून सार्वजनिक सुरक्षेचा प्रश्न निर्माण होतो, झोपड्यातील जीवन अतिशय हलाखीचे असते अशा विविध कारणांमुळे या सर्वांमध्ये झोपडपट्टीवर कारवाई करण्याच्या अपरिहार्यतेबाबत एकवाक्यता होती. जे आमदार-खासदार झोपडपट्टीतील मतांच्या जोरावर निवडून आले आहेत, त्यांनी या प्रश्नी विरोधाची भूमिका घेतली. स्वयंसेवी संघटना, जनसंघटना, झोपडपट्टीवासीय यांनी या कारवाईला विरोध करताना झोपडपट्टीवासियांचे शहरी अर्थव्यवस्थेतील स्थान, शहर-उभारणीतील त्यांचा मोलाचा (आणि त्यांच्या कष्टाचा) वाटा, झोपडपट्टीच्या प्रश्नामागील विकासाच्या प्रादेशिक असमतोलाची पार्श्वभूमी, पुनर्वसनाच्या आराखड्याशिवाय झोपडीतील लोकांचे विस्थापन करण्यामागील अन्याय्य भूमिका, प्रस्थापित व्यवस्थेकडून झोपडीपट्टीवासियांचे होणारे शोषण या मुद्यांच्या आधारे झोपडपट्ट्यांचे त्याच जागी पुनर्वसन करण्याचा आग्रह धरला.

या विविध दृष्टिकोनांमधून या प्रश्नाचे विविध पैलू पुढे येत असले तरी या प्रश्नाच्या आणखीन खोलात जाऊन त्याची मुळे शोधण्याची गरज आहे. एवढ्या मोठ्या संख्येने

लोक मुंबईसारख्या शहरांकडे धाव का घेतात? झोपडपट्ट्यातील अनारोग्यकारक जीवन, तेथील गुन्हेगारीमुळे येणारी असुरक्षितता, मानवी जीवनासाठी आवश्यक त्या किमान सुविधांचादेखील अभाव अशा आत्यंतिक प्रतिकूल परिस्थितीत राहण्याची गरज लोकांना का वाटते? आपले गाव, पाडा, वस्ती, कसबा, काही पिढ्यांची परंपरा सोडून सर्वस्वी नव्या ठिकाणी येण्याचे आंधळे धाडस करण्याची गरज त्यांना का वाटते? या प्रश्नांचा शोध घेतला तर असे दिसते की मुंबईसारख्या शहरातील जिणे कितीही अस्वच्छ, असुरक्षित असले तरी त्याची गरजच नव्हे तर आकर्षण वाटावे इतकी वाईट परिस्थिती त्यांच्या गावात आहे. तेथे सुखाने जगणे नव्हे तर तगून राहणे देखील त्यांना अशक्य झाल्यामुळेच ते मुंबईसारख्या महानगरांची वाट धरत आहेत.

आज स्वातंत्र्यानंतर सत्तावन्न वर्षांनी देशाच्या विकासावर हजारो कोटी रूपये खर्च झाल्यावरदेखील गावांची, कसब्यांची, पाड्यांची ही दयनीय अवस्था का झाली? मुंबईसारख्या शहरात एका बाजूने पैशाची, विजेची, चैनीची दिवाळी चालू असताना देशातील ग्रामीण भागावर ही अवकळा का आली? पाच दशके विकासाचा जप केल्यावर देशभरातील कोट्यावधी माणसांना आपापली घरेदारे, गाव, पाडे सोडून परागंदा होण्याची वेळ का आली? देशाच्या विकासाचे आपले प्रयत्न का फसले?

या साऱ्या प्रश्नाची उत्तरे शोधण्यासाठी आपल्याला आपल्या देशाच्या विकासनीतीकडे वळावे लागेल. कारण, आपल्या देशाने स्वातंत्र्यानंतर स्वीकारलेल्या विकासनीतीशी या सर्व प्रश्नांचा जवळून संबंध आहे.

## २. भारतातील रुढ विकासनीती : स्वरुप व व्यूहनीती

भारत स्वतंत्र झाला तेव्हा देशापुढे अनेक आव्हाने होती. भारतातील संसाधनांची ब्रिटीश अर्थव्यवस्थेच्या फायद्यासाठी करण्यात आलेली प्रचंड लूट, भारतातील भांडवलदारी व्यवस्थेचा अपुरा विकास, भांडवलदारी अर्थव्यवस्थेमुळे येथील जातिआधारित व्यवसायातून उखडले गेलेले समाजसमूह, शेतजमिनीचे जमीनदारी पद्धतीमुळे झालेले केंद्रीकरण यामुळे प्रतिकूल बनलेल्या परिस्थितीत भारताला राजकीय स्वातंत्र्य प्राप्त झाले. स्वतंत्र भारतातील वाढत्या लोकसंख्येला विकासाची फळे चाखायला मिळतील आणि सर्व लोक सुखी होतील अशी विकासनीती आखण्याचे आव्हान राजकीय

नेते, वरिष्ठ सनदी अधिकारी, अर्थतज्ञ अशा सर्वांसमोर होते. या सर्वांनी मिळून भारतासाठी जी विकास्नीती किंवा विकासमार्ग आखला बव्हंशी त्याच मार्गावरुन आपण बराच काळ प्रवास करीत आहोत.

**रुढ विकासनीतीचे स्वरुप**

या विकासनीतीचे प्रमुख उद्दिष्ट येथील लोकांची गरीबी दूर करुन त्यांचा जीवनस्तर उंचावणे हे राहिले. लोक पैशाच्या (किंवा उत्पन्नाच्या) अभावामुळे गरीब राहतात आणि सुखी जीवन जगण्यासाठी आवश्यक त्या वस्तूंचा उपभोग घेऊ शकत नाहीत. तसेच जगण्याचा दर्जा उंचावण्यासाठी आवश्यक अशा शिक्षण, आरोग्य इ. सेवांवर खर्च करु शकत नाहीत. त्यामुळे सर्व लोकांना पुरेसे उत्पन्न मिळेल असा रोजगार पुरविणे हे काम रुढ विकासनीतीमध्ये सर्वात महत्त्वाचे मानले गेले. लोकांना रोजगार मिळाला की त्यातून मिळणाऱ्या रोख उत्पन्नातून ते अन्न, वस्त्र, निवारा, आरोग्य, शिक्षण अशा जीवनावश्यक गरजा भागवतील आणि किमान जीवनस्तराच्या पातळीवर येतील. यानंतरच्या टप्प्यात लोकांचे उत्पन्न जसजसे वाढत जाईल तसतसे ते जीवनावश्यक गरजांच्या पलीकडच्या, श्रम कमी करणाऱ्या आणि मानवी आयुष्य सुखकर, ऐषोरामाचे बनवणाऱ्या वस्तू आणि सेवांवर पैसे खर्च करतील. अशा तऱ्हेने विविध गोष्टींचा उपभोग घेण्याची लोकांची ऐपत वाढत जाईल आणि सर्व लोक सुखी, समृद्ध जीवनाकडे वाटचाल करु लागतील. असे सुखी जीवनाचे स्वप्न रुढ विकासनीतीत अपेक्षित होते.

रुढ विकासनीतीने येथील सामान्य, कष्टकरी लोकांना ५० वर्षांपूर्वी दाखवलेल्या स्वप्नाकडे पाहताना आज काय दिसते? रुढ विकासनीतीच्या आजच्या उद्दिष्टात आणि त्या काळच्या उद्दिष्टात काय फरक दिसतो? रुढ विकासनीतीचे आजचे (५० वर्षांनंतरचे) प्राधान्याचे उद्दिष्टदेखील भारतातील दारिद्र्यरेषेखालील चाळीस टक्के लोकांची गरीबी दूर करून त्यांचा जीवनस्तर उंचावणे हे आहे. या लोकांना किमान अन्न, वस्त्र, निवारा तरी वर्षभर पुरेशा प्रमाणात उपलब्ध व्हावा याकरता येथील विकासयंत्रणा आजही प्रयत्न करीत आहे. या लोकांच्या गरीबीचे मूळ कारण त्यांच्याकडे असणारा पैशाचा अभाव हे असल्यामुळे या लोकांना पुरेसे उत्पन्न देणारा रोजगार मिळवून द्यायला हवा यावर विकास घडवणाऱ्या सर्वांचे एकमत आहे.

आजची परिस्थिती पाहिली तर पन्नास वर्षांपूर्वीची सुखी, ऐषोरामी जीवनाची स्वप्ने तर दूरच राहिली, पण त्या काळी कष्टाने रोजीरोटी कमावण्याचे जे स्वातंत्र्य होते, तेही नष्ट होऊन भारतभर कुपोषण, भूकबळी, बालमृत्यू, आत्महत्या, स्त्रीभृणहत्या, यांनी थैमान मांडलेले दिसते. याबरोबरच स्त्रिया, दलित यांच्यावरील वाढते अत्याचार, संघटित गुन्हेगारीचा हैदोस, जबरी चोऱ्या–दरोडे–खून यांचे वाढते प्रमाण, दंगलींमध्ये मानवी क्रौर्याने गाठलेला कळस, अपघात–घातपात यांची वाढती संख्या, नैराश्य–मानसिक असंतुलनाचे भयावह प्रमाण, विविध प्रकारच्या व्यसनात बुडालेला मोठा वर्ग या सर्व परिस्थितीकडे पाहता आपल्या तज्ञ, मुत्सद्दी, विचारवंत नेत्यांनी आखलेल्या विकासनीतीच्या मार्गावरुन आपली वाटचाल झालीच नाही का, असा प्रश्न पडतो. परंतु लगेचच आपल्या आजूबाजूला दिसणाऱ्या श्रीमंत लोकांच्या सुखवस्तू वसाहती, विविध प्रकारची वस्त्रप्रावरणे, अलंकार आणि असंख्य वस्तूंनी भरभरुन वाहणारी प्रचंड आकाराची चकचकीत दुकाने; केवळ भारतीयच नव्हे तर जगभरातील विविध देशातील खाद्यपदार्थांचा आणि पेयांचा मनसोक्त आस्वाद देणारी पंचतारांकित, सप्ततारांकित हॉटेल्स; दर दिवशी नवीन मॉडेल्सची भर पडणाऱ्या चारचाकी व दुचाकी वाहनांच्या शोरुम्स; भव्य रस्ते, उड्डाणपूल, विमानतळांची वाढती संख्या; पंचतारांकित दवाखाने आणि उच्चभ्रू कॉन्वेन्ट स्कूल्सची भरभराट, देशातील उच्चशिक्षितांचे वाढते प्रमाण आणि त्यांना परदेशातून असणारी मागणी या सर्व गोष्टींमुळे ठरवलेल्या विकासनीतीच्या मार्गावरुन आपली दमदार वाटचाल झाल्याची असंख्य उदाहरणे दिसतात.

सर्व लोकांना जगण्याचा किमान स्तर गाठता येण्याऐवजी आज एका बाजूला भौतिक भरभराट आणि दुसऱ्या बाजूला तीव्र अभावग्रस्तता अशी परिस्थिती का दिसते? विकासाची अशी दुतोंडी आणि विपरित फळे आपल्याला का मिळाली? या प्रश्नांच्या उत्तरांसाठी विकासनीतीने 'सर्व लोकांची भौतिक भरभराट' घडविण्यासाठी जे मार्ग स्वीकारले त्याकडे आपल्याला चिकित्सकपणे पाहावे लागेल.

## रुढ विकासनीतीचे मार्ग (व्यूहनीती) : आर्थिक व राजकीय आशय

### आर्थिक आशय

#### अ) आधुनिक उद्योग

सर्व लोकांची भौतिक भरभराट होण्यासाठी त्यांना विविध वस्तूंचा आणि सेवांचा पुरवठा मुबलक प्रमाणात व्हावा म्हणून रुढ विकासनीतीने आधुनिक कारखानदारीचा

मार्ग स्वीकारला. उच्च तंत्रज्ञानावर आधारित कारखान्यांची उत्पादकता खूप जास्त असल्यामुळे त्यामधून मोठ्या प्रमाणावर विविध वस्तूंचे उत्पादन करणे शक्य होते. त्याचबरोबर सर्व लोकांना रोजगार पुरविण्यासाठी आधुनिक कारखानदारीचा मार्ग उपयोगी पडेल असा विश्वास होता. उदाहरणार्थ, एखाद्या ठिकाणी कारखाना उभा राहिला की त्या कारखान्याच्या आधाराने अनेक पूरक व्यवसाय सुरु होतील आणि अनेक लोकांना त्यातून रोजगार मिळेल अशी अपेक्षा होती. कारखान्याला आवश्यक माल पुरवणारे लघु–उद्योजक, हा माल वाहून नेण्यासाठी ट्रक–टेम्पोचा व्यवसाय, ट्रक–टेम्पोसाठी इंधन पुरवठा तसेच त्याच्या दुरुस्तीचा व्यवसाय, ट्रक चालकांसाठी व कारखान्यातील कर्मचारी वर्गासाठी हॉटेल व्यवसाय, हॉटेलसाठी आवश्यक मांस, दूध, फळे, भाजीपाला याकरता जवळच्या परिसरात कुक्कुटपालन, गायी–म्हशी पालन, भाजीपाला मळे इ. गोष्टी सुरू होतील. अशा तऱ्हेने एक कारखाना उभा राहिला की अनेक लोक उत्पादन–व्यवस्थेत सामावले जातील असे मानले गेले.

या विकासमार्गामुळे भारतामध्ये जेथे कारखाने उभे राहिले तेथे मोठ्या प्रमाणावर रोजगार निर्माण झाला. त्यामुळे आजूबाजूच्या परिसरातून लोकांनी शहरात स्थलांतर करायला सुरुवात केली. आज मुंबई आणि भारतातील इतर महानगरात ओसंडून वाहणाऱ्या लोकसंख्येमुळे झोपडपट्टीसारखे जे प्रश्न निर्माण झालेले दिसतात त्याची सुरुवात आधुनिक उद्योग आणि आधुनिक शहरांच्या निर्मितीपासून झालेली दिसते. रुढ विकास धोरणांनी रोजगाराची केंद्रेच शहरात निर्माण केल्यामुळे रोजगाराच्या शोधात लोकांनी शहरात येऊन थडकणे स्वाभाविकच होते. आधुनिक उद्योग आणि त्याला पूरक व्यवसाय यांना कामगारांची गरजही होती. ही रोजगाराची केंद्रे अतिशय निवडक ठिकाणी विकसित करण्यावर रुढ विकासाचा भर राहिला. त्यामुळे भारतासारख्या आकाराने आणि लोकसंख्येने प्रचंड मोठ्या देशात निवडक (व संख्येने अतिशय कमी) ठिकाणी विविध उद्योग एकवटले गेले. परिणामी, देशाच्या विविध भागांतून रोजगाराच्या शोधात लोकांनी मोठ्या प्रमाणात स्थलांतर करुन या निवडक ठिकाणी आपले बस्तान बसविण्याचा प्रयत्न केला. लोकांना किमान जीवनस्तराची पातळी गाठता यावी यासाठी रुढ विकासनीतीने आखून दिलेलाच हा मार्ग होता.

### ब) आधुनिक शेती

भारतात अन्नधान्याचे उत्पादन मोठ्या प्रमाणावर वाढविण्यासाठी आधुनिक शेतीच्या मार्गावर भर देण्यात आला. जास्त पीक देणारी बियाणे, पाणी, रासायनिक खते, कीटकनाशके यांचा वापर वाढवून एका एकरातून जास्तीत जास्त उत्पादन मिळवणे हे आधुनिक शेतीचे उद्दिष्ट राहिले. शेतीच्या या प्रकारच्या विकासासाठी मोठ्या प्रमाणावर भांडवल गुंतवणूक केली गेली. सिंचन असणाऱ्या क्षेत्रातील आधुनिक शेतीच्या साहाय्याने भारताला अन्नधान्याच्या बाबतीत स्वयंपूर्ण बनविणे हे प्राधान्याचे उद्दिष्ट ठरल्यामुळे प्रचंड मोठ्या क्षेत्रामध्ये चालणाऱ्या कोरडवाहू शेतीच्या विकासाकडे रुढ विकासनीतीने बव्हंशी दुर्लक्षच केले. मात्र आधुनिक भांडवलसघन व यांत्रिकीकृत शेतीमुळे भांडवल गुंतवणूकीच्या प्रमाणात रोजगारनिर्मिती होऊ शकली नाही. (आधुनिक शेतीच्या धोरणांचा शेती विकासावर नेमका काय परिणाम झाला याची सविस्तर चर्चा पुस्तिकेच्या पुढील भागात केली आहे.) कोरडवाहू क्षेत्रावर अवलंबून असणाऱ्या बहुसंख्य लोकांना स्थानिक शेती व्यवस्थेतील उत्पन्नातून किमान जीवनस्तराची पातळी यावी यादृष्टीने रुढ विकासनीतीद्वारे भरीव प्रश्न करण्यात आले नाहीत. रुढ विकास धोरणांच्या परिणामी शेती क्षेत्रातील रोजगार-निर्मितीवर मर्यादा येऊन ग्रामीण भागातील लोकांचा ओघ शहरी-औद्योगिक केंद्रांकडे सुरु झाला.

### क) आधुनिक संरचनात्मक सोयी

आधुनिक उद्योग आणि आधुनिक शेती विकसित करण्यासाठी वीज, पाणी, वाहतूक, दळणवळण अशा संरचनात्मक सोयींचा (इन्फ्रास्ट्रक्चर) पुरवठा आवश्यक मानला गेला. या सोयींमुळे उत्पादन घडवणे सुलभ होईल असा विचार होता. यामुळे शहरी-औद्योगिक केंद्रांना आणि आधुनिक शेतीच्या पट्ट्यांना या सर्व सोयी प्राधान्याने पुरवण्यासाठी मोठ्या प्रमाणावर गुंतवणूक करण्यात आली.

परंतु शहरी-औद्योगिक केंद्रे आणि आधुनिक शेतीचे पट्टे भारतातील फारच निवडक ठिकाणी असल्यामुळे केवळ याच ठिकाणी वीज, पाणी इ. सोयींचे केंद्रीकरण होऊन उरलेला मोठा प्रदेश या सोयींबाबत बऱ्याच प्रमाणात वंचित राहिला. त्यामुळे जगणे सोपे बनविणाऱ्या सर्व आधुनिक सोयी-सुविधांनी युक्त शहरे आणि जीवनावश्यक सोयी-सुविधांच्याही अभावामुळे अतिशय खडतर परिस्थितीतील गावे अशी दरी निर्माण

झाली. शहरातील विविध सोयी, आरोग्य-शिक्षण या सुविधांचा चांगला दर्जा यामुळे चांगले जीवन जगण्यासाठी, मुलांना शिक्षण देऊन त्यांचे भविष्य सुरक्षित बनविण्यासाठी शहरी-औद्योगिक केंद्रामध्ये असण्याची गरज मोठ्या लोकसमूहाला वाटू लागली. थोडक्यात, किमान जीवनस्तराची पातळी गाठणे केवळ शहरी-औद्योगिक केंद्रातच शक्य व्हावे अशा तऱ्हेने रुढ विकासनीतीने सर्व सोयी-सुविधांचे केंद्रीकरण शहरात घडवले. त्या मार्गावरुन चालून मोठा लोकसमूह शहरात येऊन थडकला.

### ड) आधुनिक तंत्रज्ञान

आधुनिक उद्योग आणि आधुनिक शेतीच्या विकासासाठी आधुनिक, उच्च तंत्रज्ञानाचा वापर रुढ विकासात आवश्यक मानला गेला. सर्व लोकांसाठी पुरेशा वस्तू आणि सेवा निर्माण करण्यासाठी सतत वाढती उत्पादकता आणि वाढते उत्पादन गरजेचे होते. ही गरज तंत्रज्ञानातील प्रगतीने भागविता येईल असे मानले गेले. तंत्रज्ञानाच्या विकासामुळे वस्तूंच्या दर्जात वाढ होईल, तसेच मानवी श्रमावरील खर्च कमी होऊन उत्पादन-खर्चात बचत होईल असे मानले गेले. मानवी जीवनाचा दर्जा सुधारण्यासाठी आधुनिक तंत्रज्ञान गरजेचे मानले गेले.

रुढ विकासनीतीच्या आर्थिक आशयाच्या घडणीत वरील चार मुख्य घटकांचा मोठा वाटा आहे. रुढ विकासनीतीने मानवी सुखाचा केवळ आर्थिक दृष्टीने केलेला विचार आणि शहरी-औद्योगिक व्यवस्थेच्या 'रोजगार-उत्पन्न' या साच्यात सर्वांना बसविण्याचा केलेला प्रयत्न यामुळे सर्व विकास प्रयत्नांचे शहरी-औद्योगिक केंद्रात केंद्रीकरण झाले. एकीकडे सर्व लोकांना रोजगार पुरविण्याचे उद्दिष्ट तर दुसरीकडे उत्पादनात आधुनिक तंत्रज्ञान स्वीकारुन श्रमाचा वापर कमी करण्याची धोरणे स्वीकारल्यामुळे रुढ व्यवस्थेच्या उद्दिष्टात आणि प्रत्यक्ष वाटचालीत गंभीर अंतर्विरोध निर्माण झाले. याचे भारताच्या विकासावर काय परिणाम झाले त्याची सविस्तर चर्चा पुढील भागात केली आहे.

रुढ विकासनीती समजून घेताना तिच्या आर्थिक आशयाबरोबरच राजकीय आशयदेखील महत्त्वाचा ठरतो. रुढ विकासनीतीवर आधारित धोरणांची आखणी आणि अंमलबजावणी करण्यात येथील राजकीय व्यवस्थेची भूमिका कळीची ठरते.

## चौकट १ : उजाखा धोरणांमुळे रुढ विकासाच्या दुष्परिणामात भर

रूढ विकास प्रतिमानाच्या दुष्परिणामात १९९१ साली स्वीकारण्यात आलेल्या उदारीकरण, जागतिकीकरण, खाजगीकरणाच्या (उजाखा) धोरणांनी आणखी भर पडली असे दिसते. उजाखा धोरणांमुळे बदललेल्या परिस्थितीचे सखोल विवेचन करणे सदर पुस्तिकेच्या मर्यादेत अवघड आहे. या धोरणांच्या स्वीकाराचे भारतीय अर्थव्यवस्थेवर जे महत्त्वपूर्ण परिणाम होत आहेत त्याची येथे केवळ नोंद घेतली आहे.

अ) तंत्रशास्त्रीय बदलांचे परिणाम उद्योगांच्या रचनेवर, उत्पादन पद्धतीवर अटळपणे होताना दिसतात. औद्योगिक क्षेत्रात रोजगार–निर्मितीचे प्रमाण कमी झाल्याचे दिसते. औद्योगिक क्षेत्रात डीइंडस्ट्रीअलायझेशनची प्रक्रिया सुरु होऊन मोठे कारखाने बंद पडले. त्यामुळे त्यांच्या आधारावर चालणाऱ्या लघुउद्योगांना फटका बसला. त्यामुळे शहरी–औद्योगिक केंद्रातील औद्योगिक वसाहती बंद पडू लागल्या. कामगार–कायद्यात मोठ्या प्रमाणावर बदल होत असून कामगारविरोधी धोरणे मोठ्या प्रमाणावर पुढे रेटली जात आहेत.

ब) परकीय चलन मिळवण्यासाठी ९० नंतर निर्यातक्षम शेतीवर (त्यासाठी नगदी पिकांच्या पैदाशीवर) भर देण्यात आला. त्याचबरोबर उत्पादन वाढवण्यासाठी जैवतंत्रज्ञान व अनुवंशिकता शास्त्र (जेनेटिक इंजिनिअरिंग) यावर भर, अत्याधुनिक तंत्रज्ञानाच्या वापरावर भर, कंत्राटी शेतीचा आग्रह, डब्ल्यू टी ओ करारामुळे शेतीचा अंतर्गत व्यापार मुक्त करण्याची धोरणे, शेती क्षेत्रातील खाजगी व सरकारी गुंतवणुकीत घट इत्यादीच्या परिणामी शेतीवर अवलंबून असणाऱ्या लोकसंख्येची स्थिती अधिकाधिक बिकट होताना दिसते.

क) सेवा क्षेत्रात व्यापक स्वरूपात वाढ झालेली दिसते. मात्र या वाढीच्या शाश्वततेबद्दल निश्चित अनुमान काढणे अवघड आहे. तसेच उत्पादन वाढीतील सेवा क्षेत्राच्या वाट्याच्या मानाने रोजगार–निर्मितीतील सेवा क्षेत्राचा वाटा अत्यंत मर्यादित स्वरुपाचा राहिला आहे.

ड) राज्यसंस्थेने आपल्या तथाकथित कल्याणकारी भूमिकेचा त्याग करायला सुरुवात केली आहे. 'सर्वांना सर्व सुविधा पुरविणे' ही आपली जबाबदारी नसल्याचे राज्यसंस्थेने सूचित करण्यास सुरुवात केली आहे. कल्याणकारी क्षेत्राप्रमाणेच कारभाराच्या (गव्हर्नन्स) प्रक्रियेतही आंतरराष्ट्रीय वित्तीय संस्थांच्या हस्तक्षेपामुळे राज्यसंस्थेच्या भूमिकेवर गदा येण्यास सुरुवात झाली आहे. विविध क्षेत्रात नियमन करणाऱ्या स्वायत्त संस्था स्थापल्या जाणे हा या प्रक्रियेचा एक भाग मानता येईल.

या सर्वांच्या परिणामी रूढ विकासाच्या दुष्परिणामांच्या तीव्रतेत भर पडली असून विशेषतः वंचित घटकांच्या उध्वस्तीकरणाची प्रक्रिया अधिकाधिक तीव्र बनत चालली आहे.

### रूढ विकासनीतीची व्यूहनीती : राजकीय आशय

### अ) प्रातिनिधिक अप्रत्यक्ष लोकशाही

भारताने स्वातंत्र्यानंतर प्रातिनिधिक लोकशाहीची व्यवस्था स्वीकारली. या व्यवस्थेनुसार लोक सार्वभौम असून अंतिम राजकीय सत्ता लोकांच्या ताब्यात असते. प्रत्यक्षात, लोकांनी निवडून दिलेल्या लोकप्रतिनिधींकडून राज्यकारभार चालविला जातो. शासन सत्ता कोणाच्या ताब्यात द्यायची याचे अंतिम अधिकार लोकांकडे असल्याने बहुसंख्य लोकांच्या इच्छा, आकांक्षा, प्राधान्यक्रम या व्यवस्थेतून पूर्ण होतील अशी अपेक्षा स्वातंत्र्याच्या वेळी होती. विकासाचा मार्ग ठरविण्यामध्ये आणि या मार्गाच्या अंमलबजावणीत लोकांचा प्रत्यक्ष सहभाग नसला तरी लोकांच्या मतांवर राजकीय सत्ता अवलंबून असल्यामुळे बहुसंख्य लोकांचे हितसंबंध या व्यवस्थेत जोपासले जातील अशी आशा होती. यामुळे बहुसंख्य लोकांचा विकास साधणारी धोरणे देशात राबविली गेली नाहीत तर निवडणुकीद्वारे लोक हंस्तक्षेप करुन राजकीय व्यवस्थेला त्यात सुधारणा करायला लावतील असे मानले गेले.

### ब) राज्यसंस्थेचे महत्त्वाचे स्थान

भारतीय लोकशाही व्यवस्थेत राज्यसंस्थेकडे विविधांगी भूमिका दिली गेली आहे. राज्यसंस्थेकडे एकवटलेली दमनकारी सत्ता तसेच विकासाचे नियोजन आणि अंमलबजावणीतील कळीची भूमिका यामुळे रुढ विकासाच्या वाटचालीत राज्यसंस्थेचे अतिशय महत्त्वाचे स्थान आहे. भारताने 'कल्याणकारी राज्या'ची चौकट स्वीकारल्यामुळे येथील राज्यसंस्था समाजातील गरीब, शोषित वर्गाच्या बाजूने हस्तक्षेप करेल असे गृहीत धरण्यात आले होते. समाजातील श्रीमंत वर्गाकडून कररुपाने निधी गोळा करुन त्याचा वापर विकासाच्या परिघाबाहेरील लोकांसाठी राज्यसंस्था करेल असे मानले गेले. थोडक्यात, राज्यसंस्थेला विकास-प्रक्रिया, योजना, धोरणे ठरवण्यात तसेच त्याची प्रत्यक्ष अंमलबजावणी करण्यासाठी व्यापक अधिकार दिले गेले. समाजव्यवहारात राज्यसंस्था तटस्थ असल्याचे मानले गेल्याने ती विकासाच्या प्रक्रियेत न्याय्य भूमिका बजावेल, अशी अपेक्षा होती.

प्रातिनिधिक लोकशाही व्यवस्था आणि राज्यसंस्थेची महत्त्वाची भूमिका या दोन्ही घटकांचा भारताच्या विकास प्रक्रियेवर सखोल परिणाम झाला. लोकशाही व्यवस्थेच्या

स्वीकारामुळे आणि दीर्घ स्वातंत्र्यलढ्याच्या वारशामुळे येथील राज्यकर्त्या वर्गाला समाजात मोठ्या प्रमाणावर अधिमान्यता (legitimacy) मिळाली. त्यामुळे राज्यकर्त्या वर्गाची भूमिका, त्यांनी आखलेली नीती आणि धोरणे या सर्वांना समाजात व्यापक पाठिंबा मिळाला. राज्यकर्ता वर्ग जे घडवू इच्छितो ते मुळात सर्व समाजाच्या भल्यासाठीच आहे. ते घडवताना काही व्यक्तींच्या स्वार्थामुळे त्याच्या अंमलबजावणीत भ्रष्टाचार, गैरव्यवहार शिरतो आणि त्यामुळे विकासाच्या चांगल्या उद्दिष्टांवर पाणी फिरते अशी व्यापक भावना समाजात दिसते. भारतातील राज्यकर्ता वर्ग आर्थिक-राजकीय सत्तेबरोबरच आपल्या ताब्यातील सामाजिक आणि सांस्कृतिक सत्तेचा वापर करुन रुढ विकासाच्या स्वप्नाची मोहिनी अजूनही जनमानसावर टिकवून ठेवू शकला आहे. प्रत्यक्षात भारतात रुढ विकासनीतीचे परिणाम काय झाले हे पाहिले तर लोकशाहीच्या आवरणाखाली नेमके कोणाचे भले केले गेले हे दिसून येईल.


## ३. रूढ विकासनीतीच्या एकत्रित परिणामांची समीक्षा

एकीकडे भारतातील रुढ विकासनीतीचे भयावह अपयश आजूबाजूला दिसत असताना दुसरीकडे तीच नीती समाजावर अधिराज्य गाजवताना दिसते. विकास प्रकल्पांचा प्रत्यक्ष फटका बसलेले समाजसमूह काही प्रमाणात या विकासनीतीपुढे प्रश्नचिन्ह उभे करीत असतात. मात्र आर्थिक-सामाजिकदृष्ट्या वंचित असणाऱ्या अनेक गटांची इच्छादेखील या रूढ विकासातून निर्माण होणाऱ्या शहरी-औद्योगिक व्यवस्थेमध्ये सामावले जाऊन आर्थिक विकासाची शिडी चढण्याची आहे असे दिसते. रूढ विकासमार्गाला अशाप्रकारे समाजात मिळालेल्या व्यापक मान्यतेमुळे रूढ विकासमार्ग सर्व लोकांचा आर्थिक विकास खरोखर घडवून आणू शकतो कां? या प्रश्नाची फारशी चिकित्सा होताना दिसत नाही. झोपडपट्टीसारख्या प्रश्नांच्या मुळाशी जायचे असेल तर भारतातील रूढ विकासनीतीच्या आजवरच्या कामगिरीचे विश्लेषण करणे आवश्यक आहे.

### शहरी-औद्योगिक विकासाची बेटे

शहरे-उद्योग-केंद्री विकासनीतीमुळे भारतात काही निवडक ठिकाणी औद्योगिक क्षेत्रांचा विकास झाला. विविध उद्योगांच्या स्थापनेमुळे अशा ठिकाणी रोजगाराच्या संधी

## आकृती १ : शहरी वंचितांच्या प्रश्नांचे मूळ रुढ विकासनीतीमध्ये



मोठ्या प्रमाणावर निर्माण होऊन तेथे शहरीकरणाच्या प्रक्रियेला चालना मिळाली. उदाहरणार्थ, महाराष्ट्रामध्ये मुंबई, ठाणे, पुणे, पिंपरी–चिंचवड, नाशिक व औरंगाबाद या पट्ट्यात औद्योगिक क्षेत्राची वाढ झालेली दिसते. या शहरी–औद्योगिक केंद्रांना उत्पादन करणे सुलभ व्हावे म्हणून वीज, पाणी, वाहतूक, दळणवळण यासारख्या संरचनात्मक सोयींचा पुरवठा प्राधान्याने करण्यात आला. यासाठी प्रसंगी ग्रामीण भागातील पाणी अडवून, त्यावर धरणे बांधून या केंद्रांना अखंडित पाणी व वीज पुरवठा होईल हे पाहिले गेले. वीज उत्पादनाचा तुटवडा असला तरी या केंद्रांना अखंडित वीजपुरवठा करण्यावर भर राहिला. वाहतूक, दळणवळण इ. सोयींचा विस्तारदेखील प्राधान्याने या केंद्रांभोवती करण्यात आला. शहरी–औद्योगिक केंद्रात एकवटलेल्या रोजगाराच्या संधी, संरचनात्मक सोयींची उपलब्धता, विविध सुविधांचा चांगला दर्जा यामुळे शहरी–औद्योगिक केंद्रे जणू विकासाची बेटे बनली.

शहरी–औद्योगिक केंद्रांचा विकास घडण्यासाठी नैसर्गिक संसाधनांची मोठ्या प्रमाणावर गरज होती. ही गरज भागवण्यासाठी या केंद्रांच्या आजूबाजूच्या परिसरातील व त्यापलिकडच्या ग्रामीण भागातील नैसर्गिक संसाधनांचा वापर मोठ्या प्रमाणावर केला गेला. त्यामुळे रूढ विकासप्रक्रियेचा खोलवर व दूरगामी परिणाम भारताच्या ग्रामीण भागांवर झालेला दिसतो. शहरी–औद्योगिक केंद्रे विकसित करण्यासाठी प्रचंड भांडवल गुंतवणूक केल्यामुळे ग्रामीण भागांसाठी वीज, पाणी, वाहतूक, दळणवळण इ. संरचनात्मक सोयी तसेच आरोग्य, शिक्षण यासारख्या जीवनावश्यक सुविधा पुरवण्यासाठी पुरेशी गुंतवणूक करणे शक्य झाले नाही. याचा मोठा फटका ग्रामीण भागात मोठ्या संख्येने राहणाऱ्या लोकसंख्येला बसला. मूलभूत सोयी–सुविधांची अपुरी उपलब्धता व त्यांचा घटता दर्जा यामुळे खेड्यातील जीवनमानाचा स्तर खालावत गेला. पाण्यासारखी मूलभूत गरज भागविण्यासाठी ग्रामीण भागातील अनेक स्त्रियांचे दिवसातील कित्येक तास अजूनही खर्च होतात किंबहुना त्यात सातत्याने वाढ होते आहे ही गोष्ट या संदर्भात पुरेशी बोलकी आहे.

### शेतीक्षेत्रातील विषमता

सोयी–सुविधांच्या अभावाबरोबरच ग्रामीण भागातील बहुसंख्य लोकसंख्येचा जीवनाधार असणाऱ्या शेती क्षेत्राच्या विकासाकडे रूढ विकासनीतीने दुर्लक्ष केले. भारतातील सत्तर टक्के लोक शेती व्यवस्थेवर अवलंबून असूनदेखील शेतीव्यवस्थेला

दुय्यम स्थान देण्यात आले. ग्रामीण भागातील नैसर्गिक संसाधने आणि शेती यांचा वापर औद्योगिक क्षेत्र विकसित करण्यासाठी पूरक म्हणून करण्याचाच विचार मुख्यत: केला गेला. त्यामुळे शेती क्षेत्राचा विचार प्रामुख्याने काही कारखान्यांना कच्चा माल पुरवण्याचा स्त्रोत, औद्योगिक मालाची बाजारपेठ आणि नव्याने विकसित होणाऱ्या शहरी–औद्योगिक केंद्रातील वाढत्या लोकसंख्येला स्वस्त दराने शेतीमाल पुरवण्याचे साधन अशा रीतीने केला गेला. आधुनिक विकासाच्या संकल्पनेनुसार शेतीवर मोठी लोकसंख्या अवलंबून असणे हे मागासलेपणाचे लक्षण मानले गेले. वेगाने घडणाऱ्या औद्योगिकीकरणातून शेतीवरील लोकसंख्येचा भार कमी होऊन अधिकाधिक लोक औद्योगिक व सेवाक्षेत्रात सामावले जातील असे गृहीत धरले गेले. त्यामुळे देखील शेती क्षेत्रात गुंतवणूक करण्यास प्राधान्य देण्यात आले नाही.

अन्नधान्याच्या बाबतीत स्वयंपूर्ण होण्यासाठी सत्तरीच्या दशकात आधुनिक शेतीची किंवा हरित क्रांतीची धोरणे आखण्यात आली. पिकांचे एकरी उत्पादन वाढविण्यासाठी पाणी उपलब्ध असणाऱ्या आणि सुपीक जमिनीचे सलग लांब पट्टे असणाऱ्या प्रदेशांची निवड केली गेली. उत्पादन करण्यासाठी पूरक अशा सोयी उदा. वीज, वाहतूक इ. या भागात पुरविण्यात आल्या. भारताच्या वैविध्यपूर्ण आणि आकाराने प्रचंड शेतीक्षेत्रापैकी निवडक ठिकाणीच आधुनिक शेतीचा विकास रुढ विकासनीतीच्या धोरणांनी घडविला. हरित क्रांतीच्या धोरणामुळे देशाच्या काही निवडक भागातील अन्नधान्याच्या उत्पादनात भरीव वाढ झाली. मात्र देशस्तरावर पाहिल्यास एकूण शेतीव्यवस्थेवर या धोरणाचे घातक परिणाम झाले. हरित शेतीच्या पट्ट्यात सिंचनाच्या सोयी पुरवण्यासाठी मोठ्या प्रमाणात व प्राधान्याने गुंतवणूक करण्यात आल्यामुळे कोरडवाहू क्षेत्राकडे दुर्लक्ष होऊन तेथील अवर्षणप्रवणतेत वाढ झाली. तसेच, आधुनिक शेतीमुळे शेतकऱ्यांचे औद्योगिक उत्पादनावरील अवलंबन वाढले. (उदा. सुधारित बियाणे, रासायनिक खते, कीटकनाशके, स्वयंचलित यंत्रे यांचा वाढता वापर). आधुनिक शेतीमध्ये यांत्रिकीकरणावर भर दिल्यामुळे त्यातील रोजगार क्षमता कमी कमी होत गेली. अशाप्रकारे हरित क्रांतीचा लाभ त्या पट्ट्यातील मोठ्या शेतकऱ्यांच्या एका छोट्या गटाला झाला.

परिणामी, संसाधने आणि भांडवल यांची जी गुंतवणूक देशाच्या ग्रामीण भागात झाली तिचा लाभ बहुसंख्य शेतकऱ्यांच्या जगण्यासाठीच्या शेतीसाठी न होता भांडवली

शेती करणाऱ्या हरित पट्ट्यातील काही मोठ्या शेतकऱ्यांनाच झाला. आधुनिक शेतीच्या विकासाचे काही पट्टे सोडले तर व्यापक शेतीक्षेत्राच्या विकासासाठी कोणतीही गुंतवणूक करण्यात आली नाही. त्यामुळे अल्पभूधारक, शेतमजूर यांच्यासमोर जगण्यासाठी हरित पट्ट्यामध्ये मजुरी करणे किंवा औद्योगिक क्षेत्रात रोजगार मिळविणे हे दोनच मार्ग शिल्लक राहिले. आधुनिक शेतीमुळे काही प्रमाणात इतर पूरक व्यवसाय सुरू झाले. (उदा. ट्रॅक्टरचे सुटे भाग पुरविण्याचा व्यवसाय, ट्रॅक्टर दुरुस्ती, ट्रॅक्टरसाठी इंधन-पुरवठा इ.) परंतु, स्वयंचलित यंत्रांच्या वापरामुळे शेतीसाठी कमी मजुरांची गरज भासू लागली. यामुळे शेतीमधून उखडले जाणाऱ्यांनी रोजगार शोधण्यासाठी शहरी-औद्योगिक केंद्राकडे स्थलांतर करण्यास सुरुवात केली. महाराष्ट्राचा विचार केला तर, शेतीक्षेत्राच्या विकासाकडे केलेल्या दुर्लक्षामुळे २००० साली महाराष्ट्रातील एकंदर जमिनीपैकी फक्त १५.४% क्षेत्र सिंचनाखाली होते. (राष्ट्रीय स्तरावर हे प्रमाण ३३% आहे.) मात्र, राज्यात सिंचनाचे दुर्भिक्ष्य असतानासुद्धा एकूण ३% जमिनीवर असणाऱ्या उसावर महाराष्ट्र राज्याचे निम्मे सिंचन वापरले जाते. एवढेच नव्हे तर या उसाच्या पट्ट्यातच शेतीक्षेत्रातील गुंतवणूक व पतपुरवठा एकवटला गेला आहे. महाराष्ट्राच्या इतर भागातील शेतीक्षेत्रातील वाढीवर त्याचा अत्यंत विपरित परिणाम झाला. शेतीवर उपजीविका भागवणे अशक्य बनल्यामुळे उर्वरित महाराष्ट्रातील अल्पभूधारक, शेतमजूर यांनी शहरी-औद्योगिक केंद्रात मोठ्या प्रमाणावर स्थलांतर करण्यास सुरुवात केली. सामाजिक-आर्थिक दृष्ट्या सर्वात तळातील लोकांचा स्थलांतर करणाऱ्यांत प्रामुख्याने समावेश होता.

### ग्रामीण नैसर्गिक संसाधनांचा विध्वंस

अशा तऱ्हेने ग्रामीण भागातील नैसर्गिक संसाधनांच्या अतिवापरावर अवलंबून असणारी शहरी-औद्योगिक व्यवस्था आणि आधुनिक शेती यामुळे नैसर्गिक संसाधनांचा अवाजवी वापर व ऱ्हास मोठ्या प्रमाणावर सुरू झाला. कारखान्यांच्या गरजांसाठी जंगलतोड, जंगलामध्ये व्यापारी वृक्षांची लागवड, जमिनीवरील वृक्षाच्छादन कमी झाल्यामुळे पाणी मुरण्याचे घटलेले प्रमाण आणि मातीची होणारी धूप, रासायनिक खते व कीटकनाशके यांच्या अतिवापरामुळे जमिनीचा बिघडलेला पोत, पाण्याच्या अतिवापराने पाणथळ अथवा क्षारयुक्त बनलेल्या जमिनी, पाण्याच्या अनुपलब्धतेमुळे पडीक जमिनींचे वाढते

प्रमाण, एकपिकी पद्धतीमुळे पिकांवरील वाढते रोग, जमिनीच्या उत्पादकतेत सातत्याने होणारी घट, खनिज संपत्तीसाठी जंगलजमीन व इतरत्र केलेल्या खाण-उत्खननामुळे जमिनीचा होणारा ऱ्हास, मोठी व मध्यम धरणे तसेच मोठे वीजप्रकल्प यामुळे नैसर्गिक परिसंस्थेवर होणारा अनिष्ट परिणाम, कारखान्यांमधील रासायनिक घटकांमुळे प्रदूषित होणारे नाले-नद्या-ओढे व पाण्याचे अन्य लहान मोठे स्रोत, या सर्वांमुळे ग्रामीण भागातील नैसर्गिक संसाधनांचा विध्वंस प्रचंड प्रमाणावर झाला. मात्र, नैसर्गिक संसाधनांच्या संरक्षण व संवर्धनाचा फारसा विचार रूढ विकासनीतीमध्ये केला गेला नाही. जमीन, जंगल व पाणी यासारखी स्थानिक नैसर्गिक संसाधने टिकून राहिली तरच ग्रामीण भागातील बहुसंख्य लोकांच्या उपजीविका भागत राहतील याचा विचारदेखील केला गेला नाही. केवळ शहरी-औद्योगिक व्यवस्था आणि काही प्रमाणात आधुनिक शेती यांच्या विकासासाठी जेथे व जितका नैसर्गिक संसाधनांचा वापर करणे आवश्यक होते, तितकाच त्यांचा विकास (व अवाजवी वापर देखील) करण्यात आला. मात्र उरलेल्या नैसर्गिक संसाधनांची उत्पादकता वाढविण्याच्या दृष्टीने कोणतेही प्रयत्न करण्यात आले नाहीत. या दुर्लक्षामुळे उर्वरित नैसर्गिक संसाधनांची उत्पादकता उत्तरोत्तर घटत गेली. परिणामी, त्यावर अवलंबून असणाऱ्या ग्रामीण कुटुंबांना त्यांच्या उपजीविकेच्या गरजा भागविणे दिवसेंदिवस कठीण होत गेले. अशा प्रकारे अनेक वर्षांच्या रुढ विकास-प्रयत्नांच्या परिणामी ग्रामीण लोकांच्या हातातील जगण्याची साधने नष्ट होत गेली आणि त्यांच्या उपजीविका उध्वस्त झाल्या. गावात जगणे अशक्य बनल्यामुळे अनेक वंचित कुटुंबे आणि वंचित समाजसमूह यांचे नव्या उपजीविकेच्या शोधात शहरी-औद्योगिक केंद्राकडे स्थलांतर सुरू झाले.

## शहरी औद्योगिक व्यवस्थेच्या मर्यादा

शहरी-औद्योगिक केंद्रात उपजीविकेच्या शोधात स्थलांतर केलेल्या वंचितांना सुरुवातीच्या काही दशकात औद्योगिक क्षेत्रात कामगार म्हणून अथवा सरकारी सेवा क्षेत्रात नोकऱ्या मिळाल्या. कामगार म्हणून त्यांचे विविध प्रश्न असले तरी संघटित क्षेत्राचा लाभ मिळाल्यामुळे त्यांच्या आर्थिक स्तरात लक्षणीय सुधारणा झाली. त्यामुळे शहरी-औद्योगिक केंद्रात जाऊन उपजीविका शोधण्याच्या स्थलांतरितांच्या प्रयत्नात संघटित क्षेत्रातील रोजगार हा एक महत्त्वाचा टप्पा राहिलेला आढळतो. परंतु उच्च

तंत्रज्ञानाच्या वापरामुळे उद्योगांची रोजगारनिर्मितीची क्षमता मुळातच मर्यादित स्वरूपाची होती. सातत्याने शहरात दाखल होणाऱ्या लोंढ्यांना सामावून घेऊ शकेल ही क्षमता आधुनिक उद्योगांमध्ये कधीही नव्हती. जागतिकीकरणानंतर तर उत्पादन प्रक्रियेत वेगाने बदल घडत असून त्यामुळे औद्योगिक क्षेत्रातील रोजगार निर्मितीत वेगाने घट झाल्याचे दिसते. तसेच नोकरशाहीचा आकार कमी करण्याचा सरकारवर दबाव असून त्यामुळे सरकारी क्षेत्रातील नोकऱ्यांचे प्रमाण घटत चालले आहे. त्यामुळे शहरी–औद्योगिक केंद्रात स्थलांतरित होणाऱ्या वंचित लोकांना संघटित क्षेत्रात रोजगार मिळून ते येथील आर्थिक व्यवस्थेमध्ये खऱ्या अर्थाने सामील होतील ही गोष्ट आता शक्य राहिलेली नाही.

शहरी–औद्योगिक व्यवस्थेतील मर्यादित रोजगार क्षमता आणि या व्यवस्थेमध्ये नव्याने निर्माण होणाऱ्या रोजगार–संधींचा लाभ घेण्यासाठी आवश्यक त्या कौशल्यांचा अभाव यामुळे ग्रामीण स्थलांतरितांना या व्यवस्थेच्या परिघावरील व असंघटित क्षेत्रातील मुख्यतः कष्टाची, धोक्याची व घाणीतील कामे करणे भाग पडले. हळूहळू सर्वच स्थलांतरित वंचित लोकसमूह शहराच्या या असंघटित क्षेत्रात एकवटले जाऊ लागले. प्रामुख्याने उत्पादन व सेवा क्षेत्रातील नैमितिक कामगार म्हणून अनेक वंचित समाजघटक शहरी–औद्योगिक केंद्रात सामावले गेले. बिगारी कामगार, हमाल, मोलकरणी–घरकामगार, यंत्रमाग मजूर, मापाडी, खाजगी सफाई कामगार, माथाडी, दवाखान्यातील आया, विडी कामगार, वीटभट्टी कामगार, रिक्षाचालक, पथारीवाले, कागद–काच–पत्रा कामगार, हॉटेल कामगार, बिअरबार सेविका, वेश्या, पेपर टाकणारी मुले, एस.टी.डी. केबल बूथ चालकांकडील कामगार, वॉचमन, कुरिअर सेवा, सिक्युरिटी सेवा इत्यादीतील सेवक यांचा त्यामध्ये समावेश होतो.

### अनौपचारिक क्षेत्रातील वंचितांच्या समस्या

अनौपचारिक क्षेत्राच्या विशिष्ट स्वरूपामुळे स्थलांतरित वंचितांचे शोषण आणि हालअपेष्टा यामध्ये वाढच झाल्याचे दिसते. अनौपचारिक क्षेत्रात रोजगाराचे स्वरूप अपुरे आणि हंगामी स्वरूपाचे असते. त्यामुळे एकापेक्षा जास्त कामे स्वीकारण्याकडे लोकांचा कल असतो. लोक एकापेक्षा जास्त मालकांकडे काम करीत असल्यामुळे मालक–मजूर यांच्यामध्ये निश्चित स्वरूपाचे संबंध प्रस्थापित होऊ शकत नाहीत. त्यामुळे

असंघटित क्षेत्रात काम करणाऱ्या वंचितांना कायदेशीर संरक्षण मिळणे अवघड बनते. असंघटित क्षेत्रात कामाची ठिकाणे विखुरलेल्या स्वरूपाची असतात. त्यामुळे या कामगारांना संघटित करणे/होणे अवघड असते. कायदेशीर संरक्षणाचा अभाव, काम मिळणे सर्वस्वी मालकाच्या मर्जीवर, काम करायला तयार असणाऱ्या लोकांची सतत वाढती संख्या, या साऱ्या घटकांमुळे शोषणाविरूद्ध लढण्यासाठी असंघटित क्षेत्रातील लोकांचे संघटन घडवणे दुष्कर बनते. तसेच मजुरांच्या वाढत्या संख्येमुळे ग्रामीण विस्थापित अनौपचारिक रोजगाराच्या तुटपुंज्या संधींसाठी एकमेकांशी स्पर्धा करायला लागतात. त्यामुळे प्रत्यक्षात त्यांचे हितसंबंध सारखे असूनही त्यांच्यात शत्रुत्वाचे नाते तयार होते आणि प्रस्थापित व्यवस्थेला त्यांच्यातील स्पर्धेचा फायदा उठवता येतो. कचरा/भंगार वेचण्यासारखी अनेक कामे अतिशय अमानुष स्वरूपाची असून त्यामधून आरोग्याला धोकादायक अशा अनेक गोष्टींना वंचित घटकांना सामोरे जावे लागते. भंगार वेचण्यासारख्या काही घाणीच्या कामात गुंतलेल्या लोकांना श्रमिकांचा दर्जाही प्राप्त होत नाही. समाजाला उपयुक्त कामे हे घटक करीत असले तरी इतर समाजाकडून सातत्याने हेटाळणी, संशयाची वागणूक त्यांना अनुभवायला मिळते. या घटकांचे अर्थव्यवस्थेतील स्थानही कायमच अधांतरी, उपऱ्या स्वरूपाचे राहते कारण त्यांच्या कामाच्या शाश्वततेबद्दल त्यांना हमी वा खात्री नसते. त्याचबरोबर शहरी अर्थव्यवस्थेला आवश्यक असणारे काम हे घटक करीत असले तरी राज्यसंस्था या घटकांची कोणतीही जबाबदारी स्वीकारण्यास तयार नसते. यामुळे अतिशय असुरक्षित परिस्थितीत असे घटक काम करतात.

समाजाचा, विशेषतः उच्च व मध्यमवर्गीयांचा अशा लोकसमूहांकडे पाहण्याचा दृष्टिकोन देखील नेहमी संशयाचा, त्यांना हीन लेखणारा राहिला आहे. विविध समाजघटक असंघटित क्षेत्रातील कामगारांबाबत बऱ्याचदा असंवेदनशील, दुटप्पी दृष्टिकोन स्वीकारतात. हे लोकसमूह पुरवत असणाऱ्या सेवा आवश्यक मानल्या जातात. मात्र त्यांच्या हक्कांविषयी काही बोलणे चुकीचे मानले जाते. विविध सेवांचा उपभोग घेत असतानाच त्या पुरवणाऱ्या लोकसमूहांच्या निवाऱ्याचा प्रश्न, मूलभूत सेवा-सुविधांचा प्रश्न याविषयी समाज म्हणून आपली काही जबाबदारी आहे हे संपूर्णपणे नाकारले जाते. अशा लोकसमूहांप्रती सरकारी यंत्रणेची टोकाची अनास्था तसेच उद्धट, उद्दाम व बेपर्वाईची वागणूक या सर्वाला प्रस्थापित समाजघटकांचा मूक पाठिंबा असतो. अशा तऱ्हेने संघटन, कायदेशीर संरक्षण,

व इतर समाजघटकांची सहानुभूती या सर्वांच्या अभावी अशा समूहांचे शोषण करणे सोपे जाते.

दुसऱ्या बाजूला शहरी-औद्योगिक केंद्रातील लोकसंख्येत सतत वाढ होत गेल्यामुळे तेथे विविध प्रश्नांचा उदय झाल्याचे दिसते. उदाहरणार्थ, वाढत्या लोकसंख्येमुळे शहरांमध्ये जागेची टंचाई निर्माण होते. लोकसंख्येच्या या वाढत्या संख्येमुळे सार्वजनिक सोयी-सुविधांवर अतिरिक्त ताण निर्माण होतो. मोठ्या लोकसंख्येला मूलभूत सुविधा पुरवण्यात सरकारला अडचणी येऊ लागतात. मुलभूत सुविधांअभावी झोपडपट्टीतील जीवन बकाल बनत जाते. झोपडपट्टीत राहणाऱ्या लोकांमध्ये बेकारी, अर्धबेरोजगारीचे प्रमाण वाढत जाते. झोपडपट्ट्यांचे बेकायदेशीर स्वरूप, तेथील बेकार तरूणांचे वाढते प्रमाण यामधून स्थानिक गुंडगिरी वाढीला लागते. झोपडपट्टीतील जागेची टंचाई, अस्वच्छता आणि घाणीचे साम्राज्य, मूलभूत सुविधांअभावी लोकांची होणारी कोंडी, कामाच्या ठिकाणी होणारे शोषण, व्यसनाधीनतेचे वाढते प्रमाण, केव्हाही हुसकवले जाण्याच्या भीतीमुळे असुरक्षिततेची सततची टांगती तलवार या सर्वांमुळे झोपडपट्टीतील लोकांचे जीवनमान खालावते व शहरात रोजगार मिळवून सन्माननीय आयुष्य जगण्याची बहुसंख्य लोकांची स्वप्ने धुळीला मिळाल्याचे त्यांना स्पष्ट होत जाते. परंतु ज्या ग्रामीण भागातून ते स्थलांतरित झालेले असतात तेथील त्यांची जगण्याची साधनेच नष्ट झालेली असतात. त्यामुळे कितीही हलाखीच्या परिस्थितीत रहावे लागले तरी जगण्यासाठी शहरातील झोपडपट्ट्यांमध्ये टिकून राहण्याशिवाय त्यांच्याकडे पर्याय राहत नाही.

### स्थलांतरित वंचितांचे परिघीकरण

शहरी अर्थव्यवस्थेतील स्थलांतरित वंचितांच्या अधांतरी स्थानामुळे त्यांचे शहरी-औद्योगिक व्यवस्थेत मोठ्या प्रमाणावर आर्थिक-राजकीय परिघीकरण झाल्याचे दिसते. शहरी-औद्योगिक व्यवस्थेत उद्योगांचा महाकाय आकार आणि केंद्रीभूत रचना यामुळे या व्यवस्थेतील उद्योगपतींसारख्या बलिष्ठ घटकांच्या हाती आर्थिक-राजकीय सत्तेचे केंद्रीकरण होते. या केंद्रीत सत्तेमुळे त्यांच्या स्वतःच्या हितसंबंधांच्या विरोधी धोरणे राबवली जाऊ नयेत यासाठी राजकीय दबाव निर्माण करण्यात हे बलिष्ठ गट यशस्वी होतात.

शहरी–औद्योगिक केंद्रातील स्थलांतरित वंचित गटांना मताधिकार मिळूनदेखील राजकीय प्रक्रियेवर प्रभाव टाकण्यासाठी त्याचा फारसा उपयोग होत नाही. उत्पादनव्यवस्थेतील त्यांच्या विशिष्ट स्थानामुळे समान हितसंबंधांवर आधारित त्यांचे संघटन करणे अवघड बनते. परिणामी, आर्थिक–राजकीय निर्णयप्रक्रियेवर प्रभाव टाकण्याची या घटकांची ताकद कमी होते. भारतातील निवडणूक प्रक्रियेच्या स्वरूपात झालेल्या बदलांमुळे सुद्धा या घटकांच्या राजकीय परिघीकरणाला वेग येतो. सरकारात असताना मोठ्या जनसमूहांच्या हिताच्या विरोधी जाणारे अनेक आर्थिक निर्णय सातत्याने घेऊनसुद्धा नंतरच्या निवडणुका जिंकण्याचे तंत्र भारतातील बड्या राजकीय पक्षांनी विकसित केले आहे. परिणामी, निवडणुकींचा वापर करून राजकीय पक्षांना जनहितविरोधी निर्णयाबद्दल जाब विचारून त्यांच्यावर वचक ठेवणे आता जवळजवळ अशक्य बनले आहे. परिणामी, वंचितांच्या राजकीय परिघीकरणाची प्रक्रिया जणू पूर्णावस्थेला पोहोचली आहे. या विविध आर्थिक–राजकीय परिघीकरणाच्या प्रक्रियांमुळे असंघटित क्षेत्रातील कामगारांच्या परिस्थितीत कोणताही गुणात्मक बदल होण्याची शक्यता आता दुरावत चालल्या आहेत. थोडक्यात आर्थिक–राजकीय व्यवस्था संकुचित होत चालल्यामुळे वंचितांमधील केवळ काही व्यक्तींनाच आर्थिक–राजकीय केंद्राजवळ जागा आहे. तर मोठा वंचित लोकसमूह परिघावर आणि परिघाबाहेर फेकला जात आहे.

सारांशाने सांगायचे तर, रूढ विकास प्रतिमानाचे वंचित समाजगटांवर अनेक भयावह परिणाम झाल्याचे दिसतात. शहरी औद्योगिक विकासासाठी वंचितांच्या उपजीविकांचा आधार असणारी नैसर्गिक संसाधने उध्वस्त केली जातात. त्यामुळे स्थानिक नैसर्गिक संसाधनांवर अवलंबून असणाऱ्या वंचित समूहांना त्यांच्या मूळ ठिकाणांहून विस्थापित व्हावे लागते. या अशा विकास–प्रक्रियेतून जी शहरी–औद्योगिक उत्पादन–व्यवस्था उभी राहते त्यामध्ये सर्व लोक सामावले जातील, त्यांना सन्माननीय रोजगार मिळून त्यांचा जीवनस्तर उंचावेल असे गृहीत धरले असले तरी प्रत्यक्षात वंचित समूहांचे स्थान या उत्पादन–व्यवस्थेच्या परिघावर किंवा परिघाबाहेर राहते. अशा तऱ्हेने रूढ विकासनीतीमुळे वंचित घटक त्यांच्या मूळांपासून उखडले जातात. मात्र त्यांना सामावून घेऊ शकेल अशी आर्थिक व्यवस्था रूढ विकासनीतीतून उभी राहू शकत नाही. हे सर्व पाहता, लाखो वंचित लोकांचा जगण्याचा प्रश्न सोडविण्यासाठी पर्यायी विकासनीतीचा विचार करणे अपरिहार्य ठरते.

# ४. पर्यायी विकासनीतीचे आर्थिक अंग

गावागावातून, पिढ्यान्‌पिढ्या चालत आलेला जगण्याचा मार्ग सोडून, स्थानिक संसाधनांवरील आपले वहिवाटीचे हक्क सोडून लाखो लोक झोपडपट्टीतील नरकवासाचे जीवन जगायला तयार होतात याचे कारण अशाप्रकारे रुढ विकासनीतीमध्ये दडलेले आहे. केवळ नाईलाजानेच, इतर कोणत्याही पर्यायाच्या अभावी झोपड्यात स्थलांतरित होणाऱ्या ग्रामीण वंचितांना याबद्दल दोष देण्याऐवजी ज्या रुढ विकासनीतीमुळे भारतातील बहुसंख्य लोकांची आयुष्ये उध्वस्त झाली, त्या रुढ विकासनीतीचा पुनर्विचार करण्याची तीव्र गरज आहे. समाजातील एका छोट्या गटाला या विकास-प्रक्रियेचे सर्व फायदे मिळतात आणि त्याच गटाच्या हाती आर्थिक-राजकीय सत्ता एकवटली आहे. त्यामुळे बहुसंख्य लोकांच्या हिताच्या विरोधी असूनदेखील रुढ विकास प्रक्रिया अव्याहतपणे सुरु राहिलेली दिसते. या छोट्या पण बलवान गटाकडून विकासाचा रुढ मार्ग सर्व समाजाच्या भल्यासाठी आहे आणि त्या मार्गाशिवाय पर्याय नाही, अशी मांडणी जोरदारपणे पुढे रेटली जात आहे. या सर्व प्रयत्नांना विरोध करुन शहरी-औद्योगिक व्यवस्थेवर केन्द्रित झालेल्या रुढ विकासमार्गाच्या उपयुक्ततेचा वंचितांच्या दृष्टीने विचार करायला हवा.

### वंचितांचे स्थलांतर थांबवणे गरजेचे

झोपडपट्टीसारख्या अमानवी ठिकाणी राहाण्याची सक्ती मोडून काढण्यासाठी सर्वात आधी ग्रामीण वंचित गटांचे शहरी-औद्योगिक व्यवस्थेकडे होणारे स्थलांतर (नव्हे विस्थापन) थांबविण्याची गरज आहे. हे स्थलांतर थांबवायचे असेल तर ग्रामीण वंचित गटांना स्थानिक ठिकाणी किमान जगण्यासारखी परिस्थिती निर्माण करायला हवी. त्यांच्या उपजीविकांच्या उध्वस्तीकरणाची प्रक्रिया ताबडतोब थांबवणे त्यासाठी आवश्यक आहे. ग्रामीण वंचितांच्या उपजीविका स्थानिक नैसर्गिक संसाधनांवर मोठ्या प्रमाणावर अवलंबून असल्यामुळे नैसर्गिक संसाधनांचे शहरी-औद्योगिक व्यवस्थेसाठी मुक्त, अपव्ययी आणि निरंकुश रीतीने जे दोहन (शोषण) चालते ते ताबडतोब थांबवणे गरजेचे आहे. थोडक्यात, ग्रामीण भागातील वंचित गटांच्या उपजीविकेच्या गरजा स्थानिक ठिकाणीच पूर्ण झाल्या आणि त्यासाठी आवश्यक ती संसाधने व सोयी-सुविधा त्यांना उपलब्ध झाल्या तर हे घटक शहरी-औद्योगिक व्यवस्थेकडे स्थलांतर करणार नाहीत, हे स्पष्ट

आहे. लोकांच्या उपजीविका पूर्ततेसाठी नैसर्गिक संसाधनांचे महत्व लक्षात घेता नैसर्गिक संसाधनांचे पुनरुज्जीवन व संवर्धन करण्याची प्रक्रिया तातडीने सुरु करण्याची गरज आहे. त्यासाठी नैसर्गिक संसाधनांची उत्पादकता शाश्वत किंवा टिकावू रीतीने (रासायनिक शेतीसारख्या अशाश्वत मार्गाने नव्हे) वाढवण्यावर भर दिला पाहिजे. अशा शाश्वत मार्गाचा वापर करताना स्थानिक ठिकाणी उपलब्ध असणाऱ्या नैसर्गिक पदार्थांचा (उदा. सेंद्रिय खते व औषधे) प्राधान्याने वापर करायला हवा. यामुळे संसाधनांची उत्पादकता वाढवतानाच रोख खर्च कमी करता येईल, शहरी औद्योगिक व्यवस्थेवरील (रासायनिक पदार्थांसाठीचे) अवलंबित्व कमी होईल, शिवाय स्थानिक लोकांना रोजगारही उपलब्ध होईल.

नैसर्गिक संसाधनांची उत्पादकता वाढल्यामुळे वंचित घटकांच्या उपजीविकेच्या कामांमधून त्यांना पूर्वीपेक्षा जास्त लाभ होईल तसेच उपजीविकेची नवीन कामे सुरू होऊ शकतील. (उदा. जमिनीची सुपीकता व पाण्याची उपलब्धता वाढल्यास दुसरे पीक घेता येऊ शकेल.) त्यामुळे ग्रामीण वंचित कुटुंबांना स्थानिक ठिकाणी जगण्याची जी शाश्वती आज उरलेली नाही, ती शाश्वती मिळून वंचितांच्या उपजीविका सुरक्षित बनण्याच्या दिशेने वाटचाल सुरू होईल. वंचितांच्या उपजीविका सुरक्षित बनणे ही त्यांचे शहरी–औद्योगिक केंद्रांकडील स्थलांतर थांबविण्याची महत्त्वाची पूर्व अट आहे.

### वंचिताभिमुख विकासनीतीची गरज

रुढ विकासनीतीची कामगिरी पाहता या मार्गाने वंचितांचे शहरांकडे होणारे लोंढ्यांच्या रुपातील स्थलांतर थांबवता येणार नाही ही गोष्ट आता पुरेशी स्पष्ट झाली आहे. त्यामुळे वंचित लोकांच्या हिताचा विचार केंद्रस्थानी ठेवेल अशा वंचिताभिमुख विकासनीतीची आज तीव्र गरज आहे. वंचिताभिमुख विकासनीतीची सविस्तर मांडणी करणे सदर पुस्तिकेच्या मर्यादेत शक्य नाही. त्यामुळे येथे या विकासनीतीची फक्त दिशाच सूचित केली आहे.

वंचिताभिमुख विकासाचा विचार करताना बृहद् आर्थिक वाढीच्या उद्दिष्टाऐवजी सर्व वंचितांना उपजीविकेची हमी (किंवा सुरक्षितता) पुरवणे हे प्रथम उद्दिष्ट मानायला हवे. उपजीविकेची हमी म्हणजे कोणत्याही संकटाच्या काळातदेखील (नैसर्गिक, शारीरिक वा सामाजिक संकटे उदा. आजारपण, अपघात, मृत्यू, अवर्षण, पूर, दंगली इ.) वंचित

कुटुंबांची उपजीविका सुरळीत चालू राहील याची व्यवस्था असणे. आज वंचितांच्या उपजीविकेची परिस्थिती इतकी बिकट आहे की केवळ संकटाच्या काळातच नव्हे तर सर्वसामान्य परिस्थितीत सुद्धा त्यांना साधे जगणेदेखील मुष्कील आहे. (महाराष्ट्रात कुपोषणामुळे होणारे बालमृत्यू, शेतकऱ्यांच्या वाढत्या आत्महत्या या परिस्थितीचे निदर्शक आहेत.) यामध्ये एखादे नैसर्गिक (दुष्काळ), अथवा सामाजिक (दंगली), किंवा कौटुंबिक (दीर्घ आजारपण) संकट कोसळले तर वंचित कुटुंबांची पुरती वाताहात होते. अशा परिस्थितीत राष्ट्राच्या (म्हणजे नेमके कोणाच्या?) आर्थिक समृद्धीचे धूसर उद्दिष्ट डोळ्यासमोर ठेवण्यापेक्षा हलाखीत जीवन जगणाऱ्या वंचित कुटुंबांच्या उपजीविका सुरक्षित बनवणे ह्या ठोस व तातडीच्या उद्दिष्टालाच आपल्या सर्व विकासप्रयत्नांचे प्राथमिक उद्दिष्ट बनवायला हवे. त्यामुळे विकासाचा मार्ग वरून–खाली अशा उलट्या दिशेने आखण्याऐवजी ज्यांचा विकास घडवायचा त्या प्रत्यक्ष वंचितांच्या उपजीविकांपासून विकास प्रयत्नांची सुरुवात करणे आवश्यक आहे.

वंचितांना उपजीविकेची हमी पुरविण्यासाठी त्यांच्या उपजीविकांच्या गरजांचा विचार केंद्रस्थानी ठेवून त्यासाठी सारी संसाधने प्राधान्याने वापरण्याची गरज आहे. वंचितांच्या उपजीविकेसाठी स्थानिक नैसर्गिक संसाधनांचे महत्व लक्षात घेता त्या नैसर्गिक संसाधनांचे संवर्धन करणे आणि त्यांची उत्पादकता शाश्वत रीतीने वाढविणे आवश्यक आहे. आपण याआधी पाहिले की, नैसर्गिक संसाधनांची उत्पादकता वाढली की वंचितांचे त्यादर अवलंबून असणारे विविध उपक्रम अधिक उत्पादक बनतील. तसेच वंचितांना उपजीविकेचे नवीन उपक्रम सुरू करता येतील. यामुळे वंचितांच्या उपजीविका अधिकाधिक सुरक्षित बनत जातील आणि त्यांचे स्थलांतर थांबेल. वंचितांना उपजीविका हमी मिळाल्यानंतर केवळ तेवढ्यावर न थांबता आर्थिक सुस्थितीकडे त्यांची वाटचाल सुरू व्हावी असे प्रयत्न करण्याची गरज आहे. यासाठी स्थानिक अर्थव्यवस्था मजबूत करणे आवश्यक आहे. उद्योग व शेती क्षेत्र यांचा विकास स्थानिक अर्थव्यवस्थांना मजबूत बनविण्याच्या दृष्टीने आणि स्थानिक श्रमशक्तीला सामावून घेण्याच्या दृष्टीने करणे आवश्यक आहे. स्थानिक स्तरावरील उत्पादनासाठी आवश्यक असणाऱ्या ऊर्जासाधने, पाणी, यांचाही शाश्वतता आणि न्याय्य वाटप या दृष्टिकोनातून विचार करावा लागेल. उत्पादकता वाढलेल्या नैसर्गिक संसाधनांच्या आधारे स्थानिक स्तरावर

उत्पादन सुरु करुन तेथील आर्थिक व्यवहार वाढतील व तेथील पैसा स्थानिक अर्थव्यवस्थेत फिरता राहील अशी धोरणे आखावी लागतील. (वंचिताभिमुख विकासनीतीची दिशा कळावी याकरता फारच ढोबळ रीतीने येथे हा एक मार्ग सूचित केला आहे. वंचिताभिमुख विकासनीतीची सविस्तर चर्चा प्रयासच्या 'विकास पर्यायांच्या दिशेने' या पुस्तिकेत केली आहे. इच्छुकांनी पुस्तिकेसाठी प्रयासकडे अवश्य संपर्क साधावा.)

अशा तऱ्हेने स्थानिक ठिकाणी लोकांना प्रथम किमान जगण्याच्या आणि नंतर समृद्धीच्या, विकासाच्या संधी उपलब्ध करुन देणे अत्यावश्यक आहे. अगदी थोडक्यात सांगायचे तर, पर्यायी विकासाच्या दिशेने जाणे म्हणजे विकासाचा संपूर्ण आशय वंचिताभिमुख बनवणे होय.

## ५. पर्यायी विकासनीतीचे राजकीय अंग


### हितसंबंधियांची कारभारावरील पकड

रूढ विकास प्रतिमानाच्या घौडदौडीमध्ये आर्थिक–सामाजिक प्रक्रियांबरोबरच राजकीय प्रक्रियाही पूरक भूमिका पार पाडत असल्याचे दिसते. सरकारी खात्यातून विकास प्रकल्प, योजना, कार्यक्रम यावर मोठ्या प्रमाणात पैसे खर्च होत असल्यामुळे यावर डल्ला मारण्यासाठी आपल्याकडे राजकारणातल्या दलालांचा एक वर्ग निर्माण झाल्याचे आढळते. या राजकारणी दलालांना सामान्य लोकांच्या हिताशी काडीचेही देणेघेणे नसून स्वतःच्या स्वार्थाचादेखील दीर्घ पल्ल्याचा विचार ते करताना दिसत नाहीत. दलालांच्या या साखळीतील व्यक्ती अथवा त्यांच्या जाती बदलल्या तरी या दलालांच्या साखळीची रचना आणि तिची हव्यासी संस्कृती कायम राहते. वरच्या स्तरापासून खालच्या स्तरापर्यंत एकमेकांचे रक्षण करणारी अशी ही साखळी असल्यामुळे या साखळीतील लोकांचे गैरव्यवहार उजेडात आणणे अवघड बनते. राजकारणी दलाल आणि सरकारी अधिकारी यांच्यातील अनिष्ट युतीमुळे चोराच्या हाती तिजोरीच्या किल्ल्या असा प्रकार बऱ्याचदा होऊन बसतो.

विकास योजना, कार्यक्रम यांच्या आरेखनापासून ते अंमलबजावणीपर्यंत विविध स्तरांवर नोकरशहा व राजकारणी दलालांची साखळी कार्यरत असलेली दिसते.

विकासासाठीच्या योजना, कार्यक्रम यांची आखणी करणे, योजनेच्या लाभार्थींचे निकष ठरविणे, त्याआधारे लाभार्थी निवडणे, काही योजनांच्या बाबतीत योजना राबवण्यासाठी योग्य एजन्सीची निवड करणे, त्यासाठी निविदा काढणे, निविदांच्या आधारे कंत्राटदार निवडून त्याची कामावर नेमणूक करणे या सर्व प्रक्रियेवर राजकारणी दलालांचा मोठा प्रभाव असतो. यामुळे या सर्व कामात प्रचंड भ्रष्टाचार, कामाचा खालावलेला दर्जा, योग्य सेवेचा अभाव हे सारे दोष ठळकपणे दिसून येतात. राजकारणी लोकांकडे एकवटलेल्या आर्थिक-राजकीय सत्तेचा वापर करून ते सामान्य जनतेला काही प्रमाणात नोकऱ्या, वैयक्तिक मदत, सवलती इत्यादी पुरवतात. सामान्य लोकदेखील त्यांना मिळणाऱ्या अशा वैयक्तिक मदतीच्या बदल्यात राजकारणी दलालांच्या काळ्या कारवायांकडे दुर्लक्ष करतात. त्यामुळे सामान्य लोकांचे सरकारी यंत्रणेवर नियंत्रण उरत नाही आणि सार्वजनिक हिताकडे दुर्लक्ष होत रहाते. भ्रष्ट कारभार पोसणारी ही साखळी थोडक्यात पुढीलप्रमाणे मांडता येईल.

**आकृती २ : राजकारणी व नोकरशहा दलालांची साखळी**




या साखळीमध्ये वरच्या स्तरावरील ज्येष्ठ राजकारण्यांपासून स्थानिक राजकारण्यांपर्यन्त आणि वरिष्ठ अधिकाऱ्यांपासून स्थानिक अधिकाऱ्यांपर्यन्त विविध घटकांमध्ये आर्थिक व राजकीय लाभांची तसेच राजकीय संरक्षण व पाठिंब्याची देवाणघेवाण होत असताना दिसते. या प्रक्रियेमुळे विकासाच्या कारभारावर (गव्हर्नन्स) या साखळीतील हितसंबंधियांची घट्ट पकड निर्माण होते. या देवाणघेवाणीची व त्यामुळे

जनहितावर होणाऱ्या विपरित परिणामांची अनेक उदाहरणे देता येतील. दारिद्र्यरेषेखालच्या लोकांच्या यादीत गावातील सधन कुटुंबे असणे, रोजगार हमी योजनेतून श्रीमंत शेतकऱ्यांच्या फळबागा फुलणे, शहराच्या विकास आराखड्यातून ग्रीन बेल्टस् आणि डोंगरउताराचा भाग गायब होणे, शाळा, उद्याने, रुग्णालये याकरता राखीव असणारे शहरातील मोक्याच्या जागेवरील भूखंड नफेखोर उद्योगांना नाममात्र किंमतीने भाड्याने मिळणे, शहरात श्रीमंतांचे अनधिकृत व्यापारी गाळे, इमारतींवरील मजले वाढत राहणे या काही उदाहरणांवरुन कारभार प्रक्रियेवरील हितसंबंधियांच्या पकडीचा अंदाज येतो. या प्रक्रियेत गुंतलेल्या लोकांचे हितसंबंध, त्यांच्याकडील आर्थिक-राजकीय सत्ता आणि दंडशक्तीचा वापर करण्याची त्यांची क्षमता या साऱ्यामुळे कारभारावरील त्यांच्या नियंत्रणाला आव्हान देण्याचे धाडस सहसा केले जात नाही. यामधून हितसंबंधांची साखळी अधिकच दृढ बनत जाते. कारभारावरील नियंत्रणामधून राजकारणी लोक इतरांना विविध प्रकारचे लाभ मिळवून देण्याचे अधिकार हाती ठेवतात. या सत्तेचा वापर करून वेगवेगळ्या स्तरावरील व्यक्ती, समाजघटक यांना आर्थिक लाभ (तेही बव्हंशी वैयक्तिक वा गटाच्या स्तरावरील) मिळवून देऊन खूष ठेवण्याचा प्रयत्न केला जातो. बदल्यात त्यांच्याकडून मते व राजकीय पाठिंबा मिळवला जातो. या प्रक्रियेतून राजकारण्यांचे उत्तरदायित्व पारखून घेण्याचे, त्यांना जाब विचारण्याचे एकमेव साधन असणाऱ्या निवडणूक यंत्रणेचे महत्त्व कमी होत जाते. या सर्व प्रक्रियेमधून राजकीय माध्यमातून, संघटितपणे निर्णयप्रक्रियेवर व कारभारावर प्रभाव टाकण्याची सामान्य लोकांची क्षमता घटत जाते. यामधून परिस्थिती बदलण्याच्या संदर्भात लोकांमध्ये हतबलतेची भावना निर्माण होते. ग्रामीण भारतातील लोक जेव्हा मोठ्या प्रमाणावर स्थलांतराचा (खरे तर विस्थापनाचा) मार्ग स्वीकारतात, तेव्हा निवडणूक किंवा कोणत्याही अन्य माध्यमातून आपण आर्थिक-राजकीय हितसंबंधांच्या साखळीला आव्हान देऊ शकत नाही या टोकाच्या असहाय्यतेच्या भावनेचा त्यातून आविष्कार दिसतो.

### कारभारावर जनतेचे नियंत्रण आवश्यक

सार्वजनिक संपत्तीची होणारी लूट, पर्यावरणाची हानी, सामान्य लोकांच्या अधिकारांचा होणारा संकोच, त्यांच्या वंचिततेत पडणारी भर, आणि त्यातून घडणारे स्थलांतर/विस्थापन हे कारभारावरील हितसंबंधियांच्या वर्चस्वाचे सारेच परिणाम अत्यंत

गंभीर स्वरुपाचे आहेत. या परिस्थितीत बदल घडवण्यासाठी विकासाच्या कारभारावर स्थानिक जनतेचे आणि त्यातही वंचित लोकांचे नियंत्रण असणे आवश्यक आहे. विकासाच्या विविध योजना व कार्यक्रम यांची आखणी, त्यांची अंमलबजावणी, आणि या दोन्ही गोष्टींचे नियमन यावर जनतेचे नियंत्रण प्रस्थापित झाले तरच हितसंबंधियांच्या वर्चस्वामुळे त्यामध्ये शिरलेल्या विकृतींना आळा बसू शकेल. आणि विकास योजना-कार्यक्रम यांचा लाभ खऱ्या वंचित घटकांना मिळण्याची प्रक्रिया सुरु होईल.

कारभारावर लोकांचे प्रभावी नियंत्रण असण्यासाठी शासनाच्या व्यवहारात पारदर्शकता आणण्याचा आग्रह धरणे आवश्यक आहे. शासनाचे विविध निर्णय कसे घेतले जातात आणि त्याची अंमलबजावणी कशा रीतीने होते याची माहिती त्यातील कारणमीमांसेसह लोकांना खुली असायला हवी. शासनाच्या कारभारात पारदर्शकता आली तर लोकांच्या हाती शासनावर नियंत्रण ठेवण्यासाठी एक उपयुक्त हत्यार येईल. तसेच हितसंबंधी गट आज ज्या बेबंदपणे लोकविरोधी निर्णय पुढे रेटू शकतात त्याला आळा बसायला मदत होईल.

पारदर्शकतेबरोबरच शासनाचा कारभार लोकांना उत्तरदायी असणे आवश्यक आहे. शासनामधील ज्यांच्या हाती निर्णय घेण्याचे, कायदे-धोरणे ठरवण्याचे अधिकार आहेत, त्यांनी घेतलेल्या निर्णयाच्या व केलेल्या कामांच्या परिणामांसाठी त्यांनाच जबाबदार ठरवणे आवश्यक आहे. पारदर्शकता व उत्तरदायित्व याबरोबर शासनाच्या कारभारात लोकांचा सहभाग (दिखाऊ नव्हे तर खराखुरा) असणे हे देखील अत्यंत आवश्यक आहे. कायदे व धोरणे ठरवण्याच्या प्रक्रिया, तसेच अंमलबजावणीच्या व त्यावरील नियमनाच्या प्रक्रिया या सर्वात लोकांचा प्रत्यक्ष सहभाग असणे गरजेचे आहे. यामधून लोकांचे खरे प्रश्न, त्यांच्या गरजा, त्यांचे प्राधान्यक्रम यांना विकासाच्या कारभारामध्ये केंद्रस्थान मिळणे शक्य होईल.

अशा प्रकारे कारभारामध्ये जनतेचा सहभाग वाढला तर स्थानिक संसाधनांचा वापर, स्थानिक योजना यावर स्थानिक जनतेचे नियंत्रण प्रस्थापित होण्यास मदत होईल. यामधून लोकांची जागृती वाढून वरच्या स्तरावरील कारभारावर नियंत्रण ठेवण्याच्या दृष्टीने लोकमताचा दबाव निर्माण करणे शक्य होईल. पंचायत राज व्यवस्थेतील तरतुदींचा, नवीन बदलांचा यासाठी संधी म्हणून उपयोग यासाठी करता येईल. पारदर्शकता,

उत्तरदायित्व आणि लोकसहभाग या गोष्टींचा वापर करुन पंचायत राज व्यवस्थेच्या विविध घटकांवर स्थानिक जनतेचे नियंत्रण असणे आणि त्याद्वारे विकासाच्या कारभारावर नियंत्रण ठेवणे गरजेचे आहे. अशा प्रकारच्या जनतेच्या नियंत्रणातूनच हितसंबधियांच्या वर्चस्वाला आव्हान देणे शक्य होईल. यामुळे विकास योजना, कार्यक्रम यांचा कारभार सुधारण्याबरोबरच त्यातल्या आशयातही बदल घडण्याची प्रक्रिया सुरू होईल.

## समारोप

रुढ विकासनीती बहुसंख्य लोकांना सन्माननीय तर सोडाच पण किमान जीवनाची हमीदेखील देऊ शकत नाही, हे आता स्पष्ट झाले आहे. रुढ विकासमार्ग कायम ठेवून झोपडपट्टीसारख्या अनेक सामाजिक–आर्थिकदृष्ट्या ज्वलंत प्रश्नांवर कायमस्वरुपी तोडगा निघणे अशक्य आहे. अशावेळी वंचित घटकांच्या विकासाचा विचार प्राधान्याने करणाऱ्या पर्यायी विकासनीतीकडे जाण्याशिवाय गत्यंतर नाही. विकासाचा सध्याचा (रुढ) मार्ग समाजातील बलिष्ठ घटकांनी स्वतःच्या स्वार्थासाठी घडवलेला आहे. त्यामुळे या विकासमार्गाने गेल्यास वंचित घटक विकासाच्या परिघाबाहेरच राहणार हे स्पष्ट दिसत असताना वंचिताभिमुख विकासाचा नवीन मार्ग शोधणे हीच आजच्या काळातील अपरिहार्यता ठरते. झोपडपट्ट्यातील हलाखीचे जीवन आणि शहरी–औद्योगिक व्यवस्थेच्या तळातील अमानुष व माणसाला उध्वस्त करणारी कामे अपरिहार्य मानून विकासाच्या भाबड्या आशेने वंचितांनी ती करीत बसण्यापेक्षा सध्याच्या विकासनीतीला आव्हान देऊन तिला पर्याय शोधण्याचे काम सर्वांनी एकत्रितपणे करण्याची आवश्यकता आहे.

रूढ विकासनीतीला पर्याय सुचवण्याचे प्रयत्न जगभर अनेक अभ्यासक, कार्यकर्ते यांच्याकडून झाले आहेत. दुर्देवाने या प्रयत्नांची दखल काही निवडक चळवळी वगळता अन्य सामाजिक–राजकीयदृष्ट्या पुरोगामी चळवळी अथवा राजकीय पक्ष यांच्याकडून पुरेशा गंभीरपणे घेतली गेल्याचे दिसत नाही. त्यामुळे कोणत्याही संकल्पनात्मक मांडणीमागे चळवळीचा व पर्यायाने जनमताचा जो रेटा आवश्यक असतो तो विविध विकास पर्यायांच्या बाबतीत दिसून येत नाही. दुसऱ्या शब्दात सांगायचे तर विकास पर्यायांवरील मांडणीचे राजकीयीकरण होऊ शकलेले नाही. परंतु समतावादी व पर्यावरणस्नेही विकास घडवायचा असेल तर सध्याच्या विकासमार्गाऐवजी वेगळा विकासमार्ग कसा असेल याबाबत

संकल्पनात्मक स्पष्टता आणणे आणि तो प्रत्यक्षात आणण्यासाठी राजकीय कृती करणे अपरिहार्य ठरते.

अशा राजकीय कृतीच्या अभावी भारतातील लाखो वंचित लोकांच्या भविष्यात केवळ अंधारच असेल हे स्पष्ट आहे. भारतातील राज्यकर्ता वर्ग कोणतीही तमा न बाळगता महानगरातील वंचित घटकांविरुद्ध जोरदार कृती करत आहे. मुंबईला जागतिक दर्जाचे शहर बनविण्यासाठी तयार करण्यात आलेल्या मॅकेन्स्की कंपनीच्या अहवालाचा जो सारांश प्रसिद्ध करण्यात आला त्यानुसार मॅकेन्स्कीने यासाठी २ लाख कोटी रुपयांचा अंदाज दिला आहे. इतके भांडवल सरकारकडे नसल्यामुळे जर त्यावर कार्यवाही करायची तर राज्याला कर्जाच्या खाईत लोटल्याखेरीज या मार्गाचा स्वीकार शक्य नाही. दुसरीकडे, मुंबईत आज जे पन्नास टक्क्यांहूनही अधिक लोक झोपडपट्टीत राहतात, तिचे प्रमाण दहा टक्क्यांवर आणण्याचा प्रस्ताव अहवालात आहे. म्हणजेच मुंबईला अत्याधुनिक शहरात रुपांतरित करण्यासाठी जी प्रचंड संसाधने लागतील ती तर हक्काने ओरबाडून घ्यायचीच, शिवाय स्थानिक संसाधनांच्या ऱ्हासामुळे विस्थापित होणाऱ्या मोठा जनसमूहाला मुंबईत जागा नाकारायची असे हे धोरण आहे. या धोरणामागील आर्थिक-राजकीय हितसंबंध उघड करण्याबरोबरच ही धोरणे ज्या रुढ विकासनीतीचा भाग आहेत त्या धोरणांना आव्हान देऊन वंचिताभिमुख विकासासाठी दबाव निर्माण करणे अत्यावश्यक आहे.

वंचिताभिमुख विकास घडविण्यासाठी सध्याच्या विकासनीतीच्या आशयात आमूलाग्र बदल घडवावा लागेल. विकासाचे सध्याचे प्राधान्यक्रम जवळपास उलटे करावे लागतील. तसेच विकासाच्या कारभार-प्रक्रियेवरील हितसंबंधी गटांचे नियंत्रण मोडून काढून त्यावर वंचित गटांचे प्रभावी नियंत्रण स्थापन करावे लागेल. रुढ विकासमार्गाचे सर्व फायदे आज जे समाजघटक उपभोगतात त्यांच्याकडून अशा प्रयत्नांना अर्थातच जोरदार विरोध होईल. त्यांच्याकडे आर्थिक-राजकीय सत्ता असल्यामुळे त्यांचे वर्चस्व मोडून काढणे हे मोठे आव्हान असेल. परंतु हे आव्हान स्वीकारल्याखेरीज या अमानुष पद्धतीत बदल घडवण्याचा दुसरा मार्ग उपलब्ध नाही, हे लक्षात घेता यासाठी सर्वांनी एकत्रितरित्या जोरदार प्रयत्न करण्याची आवश्यकता आहे.

❖ ❖ ❖

# कमी खर्चाची शाश्वत शेती

## प्रयोग, प्रत्यक्षदर्शन, प्रशिक्षण,
## माहिती संकलनाचा चार सूत्री कृती-कार्यक्रम

**कमी बाह्य साधनांची शाश्वत शेती पद्धती**

ग्रामीण भागातील नैसर्गिक संसाधनांची उत्पादकता वाढवणे व त्यावर अवलंबून असलेल्या ग्रामीण लोकांच्या विशेषतः वंचित घटकांच्या उपजीविकांना बळकटी देणे ह्या उद्दिष्टांनी प्रयास संस्थेचा संसाधने व उपजीविका गट विविध प्रकारची कामे करीत आहे. कमी बाह्य साधने वापरून करावयाची कमी खर्चाची व शाश्वत शेती ह्या संकल्पनेवर आधारित कृती-कार्यक्रम हा त्या कामांतील एक महत्त्वाचा भाग आहे.

ह्या उद्दिष्टाच्या पूर्तीसाठी प्रयासतर्फे होणाऱ्या कामामध्ये कमी खर्चाच्या शाश्वत शेतीच्या पुढील चार पद्धतींवर भर दिला जात आहे. (१) सुपीक माती किंवा बागमाती तयार करणे, (२) पीक संगोपन करणे, (३) एकात्मिक कीड नियंत्रण साधणे, (४) कुंपण व सूक्ष्मवातावरण निर्मिती करणे. शाश्वत शेतीच्या या पद्धतींचा अवलंब केल्याने शेतीची उत्पादकता दीर्घकाळ टिकून राहण्यास मदत होईल. याचबरोबर बाह्य साधनांवरील अवलंबित्व म्हणजेच रोख रक्कम वा कर्जाची गरज कमी होऊन ग्रामीण भागातील वंचित घटकांच्या उपजीविकेस बळकटी मिळेल. या धारणेने प्रयासच्या संसाधने व उपजीविका गटातर्फे 'कमी खर्चाच्या शाश्वत शेती'वरील चार सूत्री कृती-कार्यक्रम राबवला जातो आहे. या कार्यक्रमात प्रयोग, प्रत्यक्षदर्शन (डेमॉन्स्ट्रेशन), प्रशिक्षण आणि माहिती संकलन अशा चार घटकांचा समावेश आहे.

सेंद्रिय पदार्थांचा वापर करून मातीचा कस व पोत सुधारण्याची तंत्रे, विविध टप्प्यांमध्ये पिकांची योग्य वाढ व्हावी यासाठी पीक संगोपनाची तंत्रे व पिकांवरील कीड व्यवस्थापनाची एकात्मिक तंत्रे यावर विविध प्रयोग प्रयासच्या अभ्यासकेंद्रावर चालू आहेत. प्रयोग व प्रत्यक्षदर्शन यातून मिळणाऱ्या तांत्रिक, आर्थिक व सामाजिक माहितीचे सखोल व पद्धतशीरपणे संकलन चालू आहे. त्याच बरोबर महाराष्ट्रातील विविध ठिकाणी चालू असलेल्या शाश्वत शेतीतील प्रयत्नांचे पत्र व प्रत्यक्षभेटीद्वारे माहिती संकलनही प्रयासतर्फे केले आहे.

---

**प्रयोग/प्रत्यक्षदर्शनाचे ठिकाण :**

प्रयास, संसाधने व उपजीविका अभ्यासकेंद्र,

द्वारा : साने गुरुजी राष्ट्रीय स्मारक, वडघर, ता. माणगांव, जि. रायगड

फोन : (०२१४०) २५०७९५, २५०२०५

# प्रयासच्या संसाधने व उपजीविका गटातर्फे चालणारे काम

२००० सालापासून प्रयास ऊर्जा गटांतर्गत 'संसाधने व उपजीविका' गट कार्यरत आहे. या गटामध्ये प्रामुख्याने नैसर्गिक संसाधने व त्यावर अवलंबून असणाऱ्या लोकांची उपजीविका या विषयावर काम सुरू आहे. वंचित घटकांच्या उपजीविकेचा प्रश्न विकासावरील चर्चेच्या व कार्यक्रमांच्या केंद्रस्थानी यावा यासाठी 'संसाधने व उपजीविका' गट काम करीत आहे. या गटातर्फे खालील विषयांवर काम चालू आहे.

**१) शाश्वत उपजीविकेच्या विकासविषयक दृष्टिकोनाच्या मांडणीचे काम :** 'शाश्वत उपजीविका' यावरील आंतरराष्ट्रीय चर्चेचा अभ्यास आणि या चर्चेत सहभागी आंतरराष्ट्रीय संस्थांच्या भूमिकेची चिकित्सा करणे हा या कामाचा पहिला टप्पा होता. अभ्यासक व कार्यकर्त्यांसमोर या चर्चेचे विश्लेषण मांडून त्यांची दृष्टी, त्यांचा अनुभव यांच्या मदतीने पर्यायी प्रतिमानाच्या संकल्पनात्मक बाजूवर विचार करणे आणि 'शाश्वत उपजीविकेच्या विकासविषयक दृष्टिकोनाची (Sustainable Livelihood Perspective) संकल्पनात्मक आणि कार्यक्रमात्मक अशा दोन पातळ्यांवर मांडणी करणे व त्या दृष्टिकोनाचा विविध प्रकारे प्रसार करणे यावर सध्या काम चालू आहे.

**२) इतर अभ्यासात्मक उपक्रम :**

अ) विकासाचे उपजीविकाकेंद्री पर्यायी कार्यक्रम विकसित करताना त्या प्रक्रियांवर वंचितांचे नियंत्रण असले पाहिजे. असे नियंत्रण मिळवण्यासाठी माहितीसंकलनापासून कार्यक्रमाच्या अंमलबजावणीपर्यंतच्या साऱ्या टप्प्यात वंचितांना खराखुरा सहभाग घेता यावा यासाठी खास साधने (tools) व पद्धती विकसित करण्यावर या गटाचे काम चालू आहे. वाडीचा/पाड्याचा/गावाचा उपजीविका जाहीरनामा तयार करण्यासाठीची साधने सध्या विकसित केला जात आहेत.

ब) 'रोजगार हमी योजना' या महाराष्ट्र राज्याच्या वैशिष्ट्यपूर्ण योजनेचे विश्लेषण करुन ही योजना वंचित घटकांच्या उपजीविका सुरक्षित करण्यासाठी साहाय्यभूत ठरावी यासाठी धोरणवकिलीचे (अॅडव्होकसी) प्रयत्न करणे, हा या गटाच्या कामाचा एक उद्देश आहे. याकरता या योजनेच्या आशयात आणि कारभाराच्या प्रक्रियेत (गव्हर्नन्स) काय सुधारणा करता येतील यावर कार्यकर्ते आणि अभ्यासक यांच्या मदतीने काम सुरू आहे.

**३) कमी बाह्य साधनांची शाश्वत शेती :** पर्यायी विकासाच्या कार्यक्रमामध्ये पर्यायी शेतीच्या तंत्रात्मक अंगाची घडण करण्याच्या दृष्टीने हा गट काम करीत आहे. समाजातील वंचित समूहांच्या शाश्वत उपजीविकेसाठी रोख पैसे व बाह्य साधनाची गरज कमी असणाऱ्या कसणुकीच्या पध्दती व तंत्रे (विशेषत: नैसर्गिक संसाधनांच्या व्यवस्थापनासंबंधी) प्रयोगाद्वारे सिद्ध करून त्याचा प्रसार करणे असे या कामाचे स्वरुप आहे. या कामामध्ये प्रयोग, प्रत्यक्षदर्शन (डेमॉन्स्ट्रेशन), प्रशिक्षण, व माहितीसंकलन असा चार सूत्री कार्यक्रम चालू आहे.

---

- आज स्वातंत्र्यानंतर सत्तावन्न वर्षांनी देशाच्या विकासावर हजारो कोटी रूपये खर्च झाल्यावरदेखील गावांची, कसब्यांची, पाड्यांची अत्यंत दयनीय अवस्था का झाली?
- मुंबईसारख्या शहरात एका बाजूने पैशाची, वीजेची, चैनीची दिवाळी चालू असताना देशातील ग्रामीण भागावर अवकळा का आली?
- पाच दशके विकासाचा जप केल्यावर देशभरातील कोट्यावधी माणसांना आपापली घरेदारे, गावे, पाडे सोडून परागंदा होण्याची वेळ का आली?
- आपले गाव, पाडा, वस्ती, कसबा, काही पिढ्यांची परंपरा सोडून झोपडपट्टीतील अस्वच्छ, असुरक्षित, नरकसमान जीवन जगण्यासाठी एवढ्या मोठ्या संख्येने लोक मुंबईसारख्या शहरांकडे धाव का घेतात?
- देशाच्या विकासाचे आपले प्रयत्न का फसले?

---

Book - Post

Stamp

प्रति,

____________________

____________________

____________________

प्रयास

---

**संसाधने व उपजीविका गट :** 'मंगेशपुष्प', सर्व्हे नं. १३३, स्वामी विवेकानंद सोसायटी, बावफच्याजवळ, वारजे, पुणे – ४११०५२, ☎ २५२३२८३६, मोबाईल – ९४२२३१७५३०, फॅक्स – २५४२०३३७ E-mail: reli@vsnl.net Web-site: www.prayaspune.org

**नोंदणीकृत कार्यालय :** अमृता क्लिनिक, आठवले कॉर्नर, कर्वे रोड, पुणे–४११००४, ☎ २५४४१२३०, २५४२०३३७.